शासन मान्य
प्रयत्न आमचे, विश्वास तुमचा...
दारू सोडवा
हमखास!
सिगारेट / गुटखा / गांजा / मावा सोडवा
(न सांगता किंवा सांगून सोडवा)
जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र
डॉ.विलास पाठक : 8308113114, 9422240654
वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ६
पत्ता: शिवाजी महाराज शॉपिंग सेंटर अलीपुर रोड बार्शी

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
दीपावलीच्या तमाम जनतेस हार्दिक शुभेच्छा !

लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ११० वा | सोमवार, दि. २५ नोव्हेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

विकणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजूस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५
८२७५२७४३५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

# कोण होणार महाराष्ट्राचा मुख्यमंत्री ?

## महायुती राबवणार 1-1-3 चा फॉर्म्यूला ?

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महायुतीच्या सरकारचा नवा मुख्यमंत्री कोण याची उत्सुकता संपूर्ण महाराष्ट्राला लागलीय. एकनाथ शिंदेंच मुख्यमंत्रिपदी कायम राहणार की देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री बनणार याबाबत वेगवेगळे दावे केले जाऊ लागलेत.

मुख्यमंत्रिपदी अजित पवारांचीही अचानक वर्णी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. तीन पक्षांमध्ये सत्ता वाटप करताना काही फॉर्म्युल्यांवर विचार होऊ शकतो. महायुती सरकारमध्ये मुख्यमंत्रिपद कुणाला मिळणार याची उत्सुकता निर्माण झालीय. विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना पुन्हा संधी मिळणार का याबाबत उत्सुकता आहे. रेकॉर्डब्रेक जागा जिंकून आणणाऱ्या माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना यांचा पुन्हा 'राजतिलक' होणार का याबाबतची चर्चा सुरु झालीय. अजितदादांनाही मुख्यमंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे. राजकीय अभ्यासकांच्या मते मुख्यमंत्रीपदासाठी काही फॉर्म्युल्यावर विचार होऊ शकतो. भाजपमधील फडणवीस समर्थक मात्र छातीठोकपणे देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होणार असं सांगतात. शिवसेना नेते तर पुन्हा एकनाथ शिंदेंनाच मुख्यमंत्रिपदाची संधी मिळावी अशी मागणी करु लागलेत. अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे 41 आमदार निवडून आलेत. भाजपची साथ देणाऱ्या अजित पवारांनाही यावेळी संधी मिळेल असं त्याचे पाठिराखे सांगू लागलेत.

दिल्लीश्वरांच्या मनात काय आहे हे अजून स्पष्ट झालेलं नाही. त्यामुळं महायुतीचा मुख्यमंत्री कोण होणार हे स्पष्ट झाल्यानंतरच सत्तावाटपाचा फॉर्म्यूलाही जनतेसमोर येणार आहे.

**मुख्यमंत्री कोण होणार ?**

महायुतीला मिळालेल्या अभुतपूर्व यशानंतर आता सरकार स्थापनेसाठी जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. मुख्यमंत्री कोण होणार याचीच चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. शिवसेना शिंदे पक्षानं 57 जागा जिंकल्या आहेत. त्याचसोबत त्यांना 4 अपक्षांनी पाठिंबा दिला आहे. शिंदेंच्या आमदारांनी शिंदेच मुख्यमंत्री व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. तर सर्वाधिक आमदार निवडून आल्यामुळे भाजपचा मुख्यमंत्री व्हावा अशी भाजपच्या आमदारांची अपेक्षा आहे. त्यामुळे मुख्यमंत्री कोण होणार याचीच जोरदार चर्चा सुरू झाली आहे.



- **फॉर्म्यूला क्रमांक-1:** शिवसेना 1 वर्ष राष्ट्रवादी 1 वर्ष आणि भाजपला 3 वर्ष अशी मुख्यमंत्रिपदाची वाटणी होऊ शकते
- **फॉर्म्यूला क्रमांक-2 :** भाजपला 5 वर्ष मुख्यमंत्रिपद शिवसेना आणि राष्ट्रवादीला महत्वाची खाती अशीही सत्तापदांची विभागणी होऊ शकते
- **फॉर्म्यूला क्रमांक-3 :** भाजपला 2.5 वर्ष मुख्यमंत्रिपद राष्ट्रवादीला 15 महिने शिवसेनेला 15 महिने मुख्यमंत्रिपद मिळू शकते.

## मी घरी बसणारा नाही, निकाल लागताच शरद पवार यांची डरकाळी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** ह्यबचेंगे तो लढेंगेह्व असा करारा जबाब पानीपतच्या लढाईत नरवीर दत्ताजी शिंदे यांनी नजीब खान याला दिला होता. या उत्तरानेच शत्रूला कापरं भरलं होतं. आता महाविकास आघाडीचं विधानसभा निवडणुकीत पानिपत झालेले असताना, त्यांच्यातील सर्वात तरुण शरद पवार यांनी हार मानण्यास नकार दिला आहे.

मी घरी बसणारा नाही, असा निर्धारच त्यांनी बोलून दाखवला. त्यांच्यातील हे फाईट स्पिरिट भल्याभल्यांना आचंबित करणारच नाहीतर एका वादळाची नांदी आहे, असं म्हटलं तरं वावगं ठरणार नाही, काय म्हणाले थोरले पवार ?

**अजितदादांना असे दिले उत्तर**

कुणी तरी बारामतीत उभं राहणं आवश्यक होतं. तिथं कुणीलाही उभं केलं नसतं तर महाराष्ट्रात मेसेज काय गेला असता. दोघांची तुलना होऊ शकत नाही हे आम्हाला माहीत होतं. अजित पवार यांचं अनेक वर्षापासूनचं राजकारण, सत्तेतील सहभाग आणि दुसऱ्या बाजूला नवखा तरुण हे आम्हाला माहीत आहे, असे उत्तर त्यांनी युगेंद्र पवार आणि अजित पवार यांच्या लढतीवर दिले. सकाळी अजितदादा या मुद्यावर भावनिक झाले होते.



**कराडमधून शरद पवार कडाडले**

ह्यकाल निकाल लागला आज मी कराडमध्ये आहे. हा निकाल लागल्यावर एखादा घरी बसला असता. पण मी घरी बसणार नाही. आमच्या तरुण पिढीला हा निकाल लागेल असं वाटलं नव्हतं. त्यांचा आत्मविश्वास वाढला पाहिजे. त्यांना पुन्हा उभं करणं, त्यांचा आत्मविश्वास वाढवणं, नव्या जोमाने कर्तृत्वान पिढी उभं करणं हा माझा कार्यक्रम राहील.ह्व असा दुर्दम आशावाद त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या या भूमिकेने आता राष्ट्रवादीत पुन्हा नवीन उत्साह संचारला आहे. त्यामुळे 'जिकडं म्हातारं फिरतंय, तिकडं चांगभलं हुतंय', असा थेट संदेश गेला आहे.

**वैचारिक अंतर केले अधोरेखित**

आमच्या लोकांची जनरेशन आहे. आमच्यावर चव्हाण साहेबांचे संस्कार आहेत. त्यांचे विचार स्वीकार आहे. त्या विचाराने काम करणारा मोठा वर्ग भाजपसोबत आहे. आमच्यातून बाहेर गेलेल्या लोकांनी निवडणुका लढल्या त्यांना यश मिळालं. त्यांची पार्श्वभूमी पाहिली तर चव्हाण साहेब किंवा गांधी नेहरूच्या विचाराने काम करणारे होते. पण त्यांनी संपर्क आणि सहयोग भाजपसोबत ठेवला हे नाकारता येत नाही. चव्हाण साहेबांनी त्यांच्या आयुष्यात कधीही त्यांनी त्या काळातील जनसंघ आणि भाजपशी संबंध ठेवला नाही. त्यांनी त्यांच्याशी शेवटपर्यंत वैचारिक अंतर ठेवलं, हे त्यांनी ठासून सांगितले. त्यामुळे येत्या काळात वैचारिक लढाईवर मोठा जोर असणार असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## सोलापूर जिल्ह्यातून काँग्रेस पक्ष हद्दपार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एकेकाळी संपूर्ण सोलापूर जिल्हा काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जायचा. परंतु गेल्या २५-३० वर्षात हा बालेकिल्ला ढासळत गेला आणि मावळत्या विधानसभेत सोलापुरात काँग्रेसकडे केवळ एकच जागा होती.

आता ही एकमेव जागा देखील गमावल्यामुळे संपूर्ण जिल्ह्यातून काँग्रेस पक्ष हद्दपार झाला आहे. सुमारे चार दशके सत्ताकारणात राहिलेले ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे आणि त्यांच्या उत्तराधिकारी असलेल्या खासदार प्रणिती शिंदे यांच्या 'उद्योगा'मुळे पक्षावर हे गंडांतर आल्याचे आता राजकीय वर्तुळात उघडपणे बोलले जात आहे.

यापूर्वी २०१४ आणि २०१९ अशा सलग दोनवेळा सोलापूर लोकसभा निवडणुकीत सुशीलकुमार शिंदे यांना पराभवाचे धक्के बसले होते. योगायोगाने त्यांच्या कन्या प्रणिती शिंदे यांनी सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातून सलग तीन वेळा प्रतिनिधित्व केल्यानंतर गेल्या लोकसभेत त्या निवडूनही आल्या. परंतु लोकसभा निवडणुकीत त्यांना स्वतःच्या शहर मध्य विधानसभा मतदारसंघातून अवघ्या ७९६ इतके तुटपुंजे मताधिक्य मिळाले होते. भाजपने हे मताधिक्य रोखून धरले होते. त्यानंतर विधानसभा निवडणुकीची तयारी करताना शिंदे कुटुंबीयांनी पक्षाची ताकद न वाढविता उलट गुंता निर्माण केला. विशेषतः खासदार प्रणिती शिंदे यांची अपरिपक्वता दिसून आली.



एकीकडे भाजपचा धार्मिक ध्रुवीकरणाचा प्रयोग आणि दुसरीकडे एमआयएम पक्षाची घुसखोरी, यातच स्वपक्षातील नाराज मंडळींनी सोडलेली साथ काँग्रेससाठी धोकादायक ठरली. हा धोका दूर करण्याच्या दृष्टीने शिंदे कुटुंबीयांनी गांभीर्याने पावले उचलली नाहीत. भाजपकडून देवेंद्र कोठे हे मोठ्या मतफरकाने निवडून येणे ही बाब सुद्धा शिंदे कुटुंबीयांच्या दृष्टीने जखमेवर मीठ चोळणारी असल्याचे बोलले जाते. दुसरीकडे सोलापूर दक्षिण मतदारसंघातही महाविकास आघाडीमध्ये लाथाळ्या वाढल्या. त्याची परिणती काँग्रेसचे अस्तित्वच हिरावून घेणारी ठरल्याचे आता उघडपणे बोलले जात आहे. सोलापूर लोकसभा क्षेत्रात पूर्वी सहापैकी भाजपचे चार आमदार होते. आता ते पाच झाले आहेत. एकट्या मोहोळमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने थोडी इभ्रत राखली आहे.

## तू पुन्हा आला की, मी पुन्हा बसणार !

**जालना (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत एकट्या भाजपने 132 जागा जिंकल्या. वर्ष 1990 नंतर विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक जागा जिंकणारा भाजपा हा पहिला पक्ष ठरला. भाजपाचे सर्वाधिक उमेदवार निवडून आल्यामुळे, देवेंद्र फडणवीसच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतील, अशी चर्चा रंगली आहे.

या पार्श्वभूमीवर, मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट इशारा दिला आहे.

मनोज जरांगे म्हणाले की, आम्ही मैदानात नव्हतो, तुला जरांगे आणि मराठा फॅक्टर कळायला हयात जाईल. आयुष्य गेलं तरी हे जरांगे काय रसायन आहे हे कळणार नाही. मदार्सारखं बोलायचं, आपण ज्याच्या सभा घेतल्या तो निवडून आला पाहिजे. मराठ्यांचे दीडशे होते, आता 204 झालेत. मराठ्यांशिवाय पान हलू शकत नाही. काहींना कुत्र्याचं कातडं पांघरून वाघ झाल्यासारखं वाटतं. मी मराठा बंधनमुक्त केला होता. राजकारणाच्या दहशतीपासून मी मराठा समाजमुक्त केला, अशी टीका त्यांनी केली.



सरकार स्थापन झाले की, आम्ही आमच्या आंदोलनाची तारीख जाहीर करणार आहोत. आरक्षण दिलं नाही तर सोडणार नाही. तू पुन्हा आला की मी पुन्हा बसणार, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी देवेंद्र फडणवीसांना दिला. आमच्या मागण्या मान्य करायच्या नाही तर सामूहिक उपोषण होणार, असा इशाराही त्यांनी दिला. मराठ्यांच्या मनगटाला मनगट लावायचे काम करायचं नाही. राज्यात अर्धी गावं आमची आहेत. आमच्याशी बेईमानी करायची नाही. माज-मस्ती आली अन मराठ्यांशी बेईमानी केली तर पुन्हा आमरण उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला.

## आ.कल्याणशेट्टी यांना अक्कलकोटकरांचा पुन्हा कौल

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या अक्कलकोट विधानसभेच्या निवडणुकीत आ.सचिन कल्याणशेट्टी यांनी माजीमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांचा तब्बल ४९ हजार ५७२ मतांनी दारूण पराभव केला आहे. कल्याणशेट्टी यांनी सलग दुसऱ्यांदा या निवडणुकीत वाजी मारली आहे.या निवडणुकीत कल्याणशेट्टी यांना १ लाख ४८ हजार १०५ तर प्रतिस्पर्धी म्हेत्रे यांना ९८ हजार ५३३ मते पडली आहेत. तर उर्वरित संतोषकुमार इंगळे (वंचित बहुजन आघाडी) ३ हजार ८०७, पूजा पाटील (अपक्ष) १४९, शिवलिंगप्पा वंगे (अपक्ष) ४२२, प्रसाद वावानगरे (अपक्ष) २४३,सुनील वंडगर (राष्ट्रीय समाज पक्ष ) १३१२, इकरार हसन शेख (वहुजन समाज पार्टी)६९४, मल्लिनाथ पाटील (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)१२९३, ज्ञानोवा साळुंखे(अपक्ष) ३११, सिध्दाराम कोळी (अपक्ष) २२८,जमीर शेख (प्रहार जनशक्ती पार्टी)७९८ अशी मते मिळालेली आहेत. शनिवारी, सकाळी आठ वाजता नवीन तहसील कार्यालयात पोस्टल मतमोजणीने प्रारंभ झाला.त्यानंतर हळूहळू कल स्पष्ट होत गेले. पहिल्या फेरीपासून अकराव्या फेरीपर्यंत सचिन कल्याणशेट्टी हे आघाडीवर राहिले. वारा, चोवीस आणि पंचवीस या तीन फेऱ्या वगळता कुठेही काँग्रेसला आघाडी मिळाली नाही.तब्बल २३ फेऱ्यांमध्ये भाजपने आघाडी मिळवून मोठा विजय संपादन केला आहे.पोस्टल मतांमध्ये सुद्धा भाजपने आघाडी घेतली.



यावेळी भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, गोकूळ शुगरचे चेअरमन दत्ता शिंदे, ज्येष्ठ नेते मल्लिनाथ मिलन अण्णाराव कल्याणशेट्टी, कल्याणशेट्टी, वाराचारी, महेश विराजदार,महेश हिंडोळे, आनंद तानवडे,सागर कल्याणशेट्टी, अविनाश मडिखांवे, मोतीराम राठोड, शिवशरण जोजन, नन्नू कोरवू,नागराज कुंभार उपस्थित होते. मतमोजणीवेळी पोलिसांनी चोख बंदोवस्त ठेवला होता.

विरोधकांच्या टीकेला मतपेटीतून उत्तर विरोधकांनी या निवडणुकीमध्ये माझ्या विरोधात जाऊन अतिशय खालच्या पातळीवर टीका केली होती. या आरोपांना जनतेने मतपेटीतून जोरदार प्रत्युत्तर दिले आहे आणि हा कौल म्हणजे जनतेने विकासाला दिलेले मत आहे. या विश्वासाला मी नक्कीच पात्र राहीन. या निकालातून जनतेने विरोधकांना त्यांची जागा दाखवली आहे. **- सचिन कल्याणशेट्टी,** नूतन आमदार

## माढ्यात अभिजित पाटील ३० हजारांच्या मताधिक्याने विजयी

**माढा, (कटूसत्य वृत्त):-** माढा विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अभिजित पाटील यांनी अपक्ष उमेदवार रणजितसिंह शिंदे यांचा ३० हजार ६२१ इतक्या मताधिक्याने पराभव केला तर महायुतीच्या उमेदवार ॲड. मीनल साठे यांना दारुण पराभवास सामोरे जावे लागले आहे.गेली तीन दशके विधीमंडळात माढ्याचे प्रतिनिधित्व केलेल्या आ. बबनराव शिंदे यांचे आपल्या मुलाला आमदार करण्याचे स्वप्न या पराभवाम ळे भंगले आहे. शिंदे समर्थकांसाठी हा पराभव मोठा धक्का मानला जातो

आहे. माढा तालुक्यातील रांझणीपासून मोडनिंबच्या बाजूला असणाऱ्या बैरागवाडीपर्यंतच्या ७८ गावात शिंदेचा प्रभाव मतदारांनी झुगारल्याचे चित्र मतमोजणीच्या माध्यमातून समोर आले

आहे. विजयानंतर पत्रकारांशी बोलताना रणजित शिंदे यांचा पराभव नवनिर्वाचित आमदार अभिजित पाटील यांनी देशाचे नेते शरद पवार आणि राज्याचे नेते विजयसिंह मोहिते-पाटील

यांचे आशीर्वाद आणि मतदारराजाने एका शेतकऱ्याच्या मुलाला आमदार केले आहे. हा विजय मी त्या शेतकरी राजाला समर्पित करतो, असे सांगत तीस वर्षांच्या एकहाती सत्तेला सुरंग

लागला असून एकहाती सत्ता केंद्रित करणाराची अकर्तृत्वान पिढीला जनतेने नाकारले असल्याचे सांगितले. विजयानंतर नवनिर्वाचित आ. अभिजित पाटील यांच्या समर्थकांनी मोठा जल्लोष मतमोजणी केंद्र परिसरात केला, येथून त्यांची विजयी मिरवणूक काढण्यात आली. शनिवारी सकाळी आठ वाजता कुडूवाडी येथील वखार महामंडळाच्या गोदामात मतमोजणी सुरू झाली. सुरुवातीला अभिजित पाटील यांच्यापेक्षा कमी मताच्या फरकाने रणजितसिंह शिंदे हे आघाडीवर होते. हे कमी मतांचे मिळत असलेले मताधिक्य मतमोजणीच्या तेराव्या फेरीपर्यंत कायम होते. माढा मतदारसंघात समाविष्ट असलेल्या पंढरपूर भागातील गावे सुरू झाल्यानंतर मात्र अभिजित पाटील यांच्या मताधिक्यात झपाट्याने वाढ होत गेली, ते शेवटच्या फेरीपर्यंत राहिले व यात अभिजित पाटील यांचे मताधिक्य वाढले.माढा तालुक्यातील समाविष्ट असलेल्या ७८ गावातदेखील अभिजित पाटील यांनी मिळविलेला प्रतिसाद यामुळे या गावात त्यांना मताधिक्य मिळाले नसले तरी त्यांनी रणजितसिंह शिंदे यांना केवळ ५२१ मताधिक्यावर सीमित ठेवण्यात त्यांना यश मिळाले.महायुतीच्या उमेदवार ॲड. मीनल साठे यांना मिळालेली पाहता त्यांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचादेखील लाभ मिळाला नाही, हे अधोरेखित झाले.



## लाडकी बहिणींच्या मतदानरूपी आशिर्वादने महायुतीचा ऐतिहासिक विजय- संतोष भाऊ पवार

## या निवडणुकीत लाडक्या बहिणींनी विरोधकांना त्यांची जागा दाखवून दिली- अमोल बापू शिंदे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** लोकसभा निवडणुकी नंतर राज्यात चर्चा होती ती विधानसभेची .या निवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष विशेषतः लागून राहिले होते. अनेकांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी काटे की टक्कर एकंदरीत पाहायला मिळाली. मात्र यंदाच्या निवडणुकीत मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना प्रभावी ठरली आणि राज्यातील महायुती उमेदवारांच्या पाठीशी खंबीरपणे लाडक्या बहिणी उभे राहत महाविकास आघाडी च्या उमेदवारांचा सपडा सुड करण्यात आला. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, देवेंद्र फडणवीस यांनी मोदी है तो मुमकिन है असा विश्वास मतदारांमध्ये संपादित करत विविध योजनांच्या माध्यमातून राज्याच्या सर्वांगीण विकास केला. विरोधकांनी लाडकी बहीण योजनेला तीव्र हरकत घेतली होती मात्र राज्याच्या सक्षम सरकारने विरोधकांच्या भूमिकेकडे दुर्लक्ष करत लाडक्या बहिणींना योजनेचा सर्वाधिक फायदाच करून दिला . महायुती सरकारला राज्यात 234 तर महाविकास आघाडी सरकारला 50 जागा मिळाल्या. महाविकास आघाडी मधील अनेक दिग्गज नेत्यांना राज्यातील मतदारांनी "ना घर का ना घाट का " अश्या संभ्रम अवस्थेत (पान 2 वर..)



## होटगी रोड सोलापूर विमानतळावरून मुंबई आणि गोवासाठी थेट विमानसेवा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरकरांची बहुप्रतीक्षित थेट विमानसेवा सुरू होणार आहे. होटगी रोड सोलापूर विमानतळावरून फ्लाय ९१ एअरलाईन्सची विमानसेवा २० डिसेंबरपासून सुरु होणार असून मुंबई आणि गोवा यांसारख्या महत्त्वाच्या शहरांसाठी थेट उड्डाणे दिली जाणार आहेत, अशी माहिती सोलापूर विकास मंचचे सदस्य विजय जाधव यांनी दिली आहे.

ही सेवा सुरू करण्यासाठी सोलापूर विकास मंचाच्या अथक प्रयत्नांमुळेच हे स्वप्न साकार होऊ शकले आहे. सोलापूरकरांसाठी हे अत्यंत अभिमानाचे आणि आनंदाचे क्षण आहेत.

**मुंबईसाठी उड्डाण वेळापत्रक -**

- सोलापूर - मुंबई सकाळी ०९:४० वाजता विमान उडणार. स. १०:४० मुंबईत पोचणार
- मुंबई - सोलापूर दुपारी १२:४५ वाजता विमान उडणार. दुपारी १:४५ सोलापुरात येणार.

**गोवासाठी उड्डाण वेळापत्रक**

- सोलापूर - गोवा
- दुपारी ०२:१५ वाजता
- दु. ०३:१५ गोवा पोचणार
- गोवा - सोलापूर सकाळी ०८:१० वाजता
- स. ०९:१० सोलापुरात पोचणार.



## संपादकीय

# महायुती का लाडकी ठरली?

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांमध्ये भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी आणि मित्र पक्षांच्या महायुतीला मिळालेल्या घवघवीत विजयाला अनेक कारणे आणि कंगोरे आहेत; पण मुख्यत्वे करून या विजयामध्ये महाराष्ट्रातील महिला मतदारांचा वाटा सिंहाचा आहे, हे नाकारून चालणार नाही. मुख्यमंत्री लाडकी बहीण ही महायुतीची योजना गेमचेंजर ठरली, याबाबत कुणाचेच दुमत असण्याचे कारण नाही. एकूण मतदानात महिला मतदारांचा वाढलेला टक्का महायुतीचा विजय निश्चित असल्याचे दर्शवणारा होता.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांच्या निकालांनी केवळ राज्याच्या राजकारणाची दिशा स्पष्ट केलेली नसून भारतीय लोकशाहीतील काही पारंपरिक समीकरणांबाबत पुनर्विचार करण्याचा संदेशही दिला आहे. विशेषतः 'आधी आबादी' म्हणवल्या जार्णाया महिला मतदारांच्या बाबतीत इथल्या पुरुषसत्ताक व्यवस्थेला खरोखरीच आत्मचिंतन करण्याची वेळ आता आली आहे. कारण, महायुती सरकारला मिळालेल्या घवघवीत यशामध्ये वाढलेल्या महिला मतदानाचा वाटा सर्वाधिक आहे. 1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतरची अनेक वर्षे पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्थेत घरचा धनी सांगेल त्याला निमूटपणाने मते देणाऱ्या मायमाऊली देशाने पाहिल्या. अगदी देशाच्या पंतप्रधानपदी खंबीर, कणखर महिला विराजमान होऊनही गावगाड्यातील महिलांच्या मतांवरचा पुरुषांचा प्रभाव आणि वरचष्मा काही केल्या कमी झाला नाही. कालौघात स्त्रिया शिकल्या, नोकरी-व्यवसाय करू लागल्या, आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनल्या आणि त्यांची मते मोकळेपणाने मांडू लागल्या. महिलांची एकजूटही वाढली. बचत गट, महिला मंडळे, भिशी मंडळे आदी अनेक कारणांनी महिला संघटित होऊ लागल्यामुळे त्यांच्या मतांना किंमत आली. राजकीय क्षेत्रानेही याची दखल घेत महिलानुकूल निर्णय घेत त्यांना सक्षम बनवण्यासाठी विविध योजनांची आखणी केली. चालू विधानसभा निवडणुकांमध्ये 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' ही योजना सर्वाधिक लोकप्रिय ठरली असली, तरी ही संकल्पना महाराष्ट्राची नाही. यापूर्वी मध्य प्रदेशात शिवराजसिंग चौहान यांनी 'लाडली बहना योजने'च्या माध्यमातूनच पुन्हा एकदा सत्तेचा सोपान चढला.

गतवर्षी झालेल्या मध्य प्रदेश विधानसभा निवडणुकांमध्ये ही योजना भाजपसाठी ट्रम्पकार्ड ठरली होती. त्यामुळे लोकसभेला बसलेल्या जबरदस्त तडाख्यानंतर भाजप-शिवसेना आणि राष्ट्रवादी यांच्या महायुती सरकारने तातडीने ही योजना लागू केली. महायुतीच्या संपूर्ण निवडणूक प्रचारात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असोत किंवा देवेंद्र फडणवीस असोत किंवा अजितदादा असोत या सर्वांनी या योजनेची जोरदार प्रसिद्धी केली होती. जाहिरातींच्या अफाट र्मायातही 'लाडकी बहीण'च केंद्रस्थानी राहिली. विधानसभा निवडणुकांचा बिगुल वाजण्याआधीच 7,500 रुपये राज्यातील सुमारे दोन कोटी महिलांच्या खात्यात जमा करून महायुतीने अचूक नेम साधला होता. त्यामुळे ही योजना महायुतीसाठी गेमचेंजर ठरणार, याचे संकेत मिळतच होते. या जोडीला राज्यात महिलांना निम्म्या दरात बसचा प्रवास करण्याची सुविधाही या सरकारने दिली होती. याखेरीज अन्नपूर्णा योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या मागास महिलांना वषार्ला तीन सिलिंडर मोफत, आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थिनींना मोफत उच्च शिक्षण यासारख्या काही योजनांच्या माध्यमातून महायुती सरकारने ही निवडणूक महिलाकेंद्री बनवली. यामागे राजकीय स्वार्थाबरोबरच आणखी एक पैलू होता तो म्हणजे विकसित भारताचा. विविध आर्थिक सर्वेक्षणांनी आणि अर्थतज्ज्ञांनी भारतात महिलांचे आर्थिक सक्षमीकरण योग्य प्रकारे झाल्यास जीडीपीचा दर सुमारे दोन ते तीन टक्क्यांनी वाढू शकतो, अशा आशयाच्या सूचना केलेल्या आहेत. त्यामुळे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा एक पैलूही या योजनांमागे होता.

या योजनांचे सर्वांत मोठे यश म्हणजे महाविकास आघाडीनेही आपल्या जाहीरनाम्यात महिलांना दरमहा तीन हजार रुपये, बसचा प्रवास पूर्ण मोफत अशा प्रकारच्या आश्वासनांची सरबत्ती केली. यामुळे ही निवडणूक महिलांभोवती केंद्रित करण्याच्या भाजपच्या प्रयत्नांना अधिकच बळकटी मिळाली आणि राज्यात सत्तेच्या चाव्या महिलांच्या हाती गेल्या. दुसरीकडे यंदाच्या विधानसभेला महिलांच्या मतदानात लक्षणीय वाढ झाली. महाराष्ट्रात पहिल्यांदाच महिलांनी एवढ्या प्रमाणावर मतदान केल्याचे दिसून आले. यामध्ये विशेषतः ग्रामीण भागात महिला मतदारांनी दाखवलेला उत्स्फूर्त प्रतिसाद उल्लेखनीय ठरला. राज्यात महिलांचे मतदान किमान 3 ते कमाल 20 टक्क्यांनी वाढल्याचे दिसून आले. विदर्भ आणि मराठवाड्यात ही वाढ अधिक प्रकषार्ने दिली. संभाजीनगर जिल्ह्यात पुरुषांचे मतदान 15 हजारांनी घटल्याचे, तर महिलांचे मतदान 91 हजारांनी वाढल्याचे दिसून आले. परभणीत लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत सुमारे 10 टक्के जास्त महिला मतदारांनी विधानसभा निवडणुकीत मतदान केले.

सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अनेकांनी या योजनांच्या आमिषांनी महिलांचे वस्तुकरण झाल्याची टीका केली असली, तरी त्यापलीकडचा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कुटुंब आणि जातीच्या आदेशाबाहेर जाऊन महिला स्वतंत्रपणाने मतदान करू शकत नाहीत, हे गृहितक या निवडणुकीने खोटे ठरवले. माझ्या मते, हे एक खूप मोठे परिवर्तन आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. तसे पाहिल्यास मोदी सरकारने 2014 मध्ये सत्तेत आल्यापासून उज्ज्वला गॅस योजना, बेटी बचाओ, बेटी पढाओ, मातृसुरक्षा, सुकन्या योजना यासारख्या अनेक योजनांच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला पूर्वीच्या सरकारांच्या तुलनेत खूप मोठ्या प्रमाणावर चालना दिली होती.

तिहेरी तलाकसारख्या मुद्द्यावरील केंद्र सरकारची भूमिका मुस्लीम समाजाला रुचली नसली, तरी अनेक मुस्लीम महिलांनी याचे स्वागत केले होते. उत्तर प्रदेशात 2022 मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये भाजप आणि योगी आदित्यनाथ सरकारला महिला मतदारांनीच विजय मिळवून दिला होता. तीच श्रृंखला महाराष्ट्रात महायुती सरकारने पुढे सुरू ठेवली आणि आता निकालातून त्याला यश लाभल्याचेही दिसत आहे.

# महाविकास आघाडीमध्ये आपसी तालमेलच्या अभावामुळे दारूण पराभव

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीवर देशासह जगाचे संपूर्ण लक्ष होते. कारण महाराष्ट्राची राजधानी मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने या निवडणुकीला आगळेवेगळे महत्त्व होते.त्यामुळे महायुतीसह भाजपचे संपूर्ण लक्ष महाराष्ट्रावर होते. त्याच पध्दतीने त्यांनी व्युहरचना आखली. परंतु महाविकास आघाडीतील घटक पक्षांमध्ये आपसी तालमेलचा अभाव मोठ्या प्रमाणात दिसून आला.कारण निवडणुकीच्या आधीच उध्दव ठाकरे गटाकडून मुख्यमंत्री पदाचा दावा होत होता, त्याचप्रमाणे शरद पवार गटाकडून जयंत पाटील यांच्या नावाची चर्चा होत होती तर दुसरीकडे काँग्रेसकडुन बाळासाहेब थोरात, पृथ्वीराज चव्हाण व नाना पटोले यांच्या नावाची चर्चा अशाप्रकारे तीन्ही पक्ष मुख्यमंत्री पदाची दावेदारी करतांना दिसत होते. त्याचप्रमाणे जागा वाटपामध्ये शेवटपर्यंत मोठ्या प्रमाणात रस्सीखेच दिसून आली व लहान भाऊ -मोठा भाऊ अशी चर्चा रंगु लागली.कारण महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांना लोकसभेच्या विजयाचे घमंड आले होते.आपण जर महाविकास आघाडीचा लोकसभा निवडणुकीतील विजयाचा विचार केला तर त्यांच्या खासदारांच्या तुलनेत प्रत्येक खासदारांच्या मतदार क्षेत्रातुन कमीत कमी ४ आमदार तरी निवडून यायला पाहिजे होते.परंतु प्रत्येक खासदारांच्या तुलनेचा विचार केला तर एका खासदारांच्या मतदार क्षेत्रातुन फक्त १.५० खासदार निवडून आल्याचे दिसून येते.म्हणजेच काँग्रेसचे -१६, उध्दव ठाकरे गटाचे-२० व शरद पवार गटाचे १० अशाप्रकारे महाविकास आघाडीचे ४६ आमदार निवडून आलेत.एका खासदार क्षेत्रात कमीत कमी ६ आमदार असतात त्या पध्दतीने लोकसभा क्षेत्रानुसार महाविकास आघाडी अर्धेही आमदार निवडून येवू शकले नाही ही महाविकास आघाडीच्या बाबतीत शोकांतिका म्हणावी लागेल.महाविकास आघाडीच्या काही लोकसभा क्षेत्रात तर संपूर्णपणे सुपडा साफ झाल्याचे सुध्दा दिसून आले. यावरून असे लक्षात येते की महाविकास आघाडीला वाटत होते की आपल्या जवळ २९ खासदार आहेत म्हणजेच जवळपास आपले १४५ आमदार अवश्य निवडून येतील असे गृहीत धरून निश्चिंत होते आणि हाच अहंकार आज त्यांच्या मानगुटीवर बसला व पराजयाचे कारण बनले आहे आणि आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की विरोधी पक्षनेते पदासाठी पाहिजे असलेल्या २९ जागा सुध्दा आघाडीतील कोणताही पक्ष प्राप्त करू शकला नाही हे मोठे दुर्भाग्य म्हणावे लागेल.आघाडीचा अहंकाराचा व त्यांच्यातील आपसी तालमेलचा अभाव याचाच सटीक आणि अचुक फायदा महायुतीतील घटक पक्ष भाजप, शिंदे गट व अजित पवार गट यांनी घेतला आणि त्याच पद्धतीने गेल्या सहा महिन्यांपासून त्यांनी कामाला सुरुवात केली.त्यामुळेच आज महायुतीला भरघोस यश प्राप्त झाले व महाविकास आघाडीला ४६ जागांवर रोखण्यात यश प्राप्त झाले.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

पान १ वरून

## लाडकी बहिणींच्या मतदानरूपी...

टाकत घरचा रस्ता दाखवला. सोलापूर मध्ये तिन्ही मतदार संघातील उमेदवारांचा दणदणीत विजय झाला . विरोधकांच्या पोकळ आश्वासनांना मतदारांनी मतपेटीतून चोख प्रत्युत्तर देत महायुतीच्या उमेदवारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे पसंत केले. आणि मतदारांनी दाखवलेल्या या विश्वासावरच महायुतीच्या उमेदवारांचा प्रचंड मताधिक्याने विजय झाला.त्याच पार्श्वभूमीवर सोलापुरात राष्ट्रवादी व घटक पक्ष असलेल्या शिवसेना आणि भाजपने अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांना त्रिवार मानाचा मुजरा करत छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आपापल्या पदाधिकाऱ्यांसह जल्लोष साजरा केला.गुलालाची मुक्त उधळण करत,हल्यांचा कडकडाटात फटाक्यांची आतिषबाजी आणि विजयी मिरवणूक काढून हा जल्लोष साजरा करण्यात आला.यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय जय भवानी जय शिवाजी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विजय असो, महायुती सरकारचा विजय असो अश्या घोषणा यावेळी देण्यात आल्या. महायुतीतील प्रमुख पदाधिकारी यांनी एकमेकांना मिठाई खाऊ घालून विजयाचा आनंद साजरा केला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे शहर जिल्हाध्यक्ष संतोष भाऊ पवार, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल बापू शिंदे,भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांच्यासह जेष्ठ नेते, प्रांतिक सेलचे सर्वच प्रमुख पदाधिकारी नेते, फ्रंटल सेलचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष, पदाधिकारी महिला आघाडी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार,शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल बापू शिंदे, भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी महायुती सरकारने केलेल्या राज्याच्या सर्वांगीण विकासाच्या जोरावर मतदारांनी विरोधकांच्या भुलथापांना बळी न पडता मत पेटीतून चोख प्रत्युत्तर देत महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचंड मताधिक्याने विजय केला. या विजयात लाडक्या बहिणींचा सिंहाचा वाटा आहे.हा विजय केवळ महायुतीचा नसून तो मतदारांचा आहे. यापुढे देखील महायुतीचे हे आपल्या हक्काचे सरकार विविध योजनांच्या माध्यमातून राज्याचा सर्वांगीण विकास करण्यावर यापेक्षाही अधिक भर देईल. मतदारांचे आभारी आहोत. विजयी उमेदवारांना शुभेच्छा अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

महायुतीचे उमेदवार सलग पाचव्यांदा प्रचंड मताधिक्याने विजयी झालेले लोकप्रिय आमदार विजयकुमार देशमुख यांनी भाजपा व राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना समवेत विजयाचा आनंद साजरा केला. सुरवातीस छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूणार्कृती पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. तदनंतर चार हुतात्मा चौक , पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर,विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. यावेळी त्यांनी आपल्या मनोगतात हा विजय केवळ महायुती सरकारचा नसून तो मतदार राजाचा आहे . देशाचे विकासरत्न पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रातील आपल्या हक्काचे सरकार वेगवान पद्धतीने राज्याचा सर्वांगीण विकास करत आहे. आणि या विकासाच्या जोरावरच राज्यात महायुतीला सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत ही खूप आनंदाची गोष्ट आहे. येणाऱ्या काळात घटक पक्षातील पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेत सोलापूरच्या सर्वांगीण विकास साधण्यावर विशेष भर दिला जाईल अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

सोलापूरच्या विजयी उमेदवारांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुभेच्छा दिल्या.

# न्यासाने स्वामी भक्तांकरिता अध्यावत असे विविध कामे केलेली आहेत- न्यायमूर्ती जी.बसवराज

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाने स्वामी भक्तांकरिता अध्यावत असे विविध कामे केलेली आहेत, काळाची गरज ओळखून केलेला विकास कार्य हे कौतुकास्पद असल्याचे मनोगत कर्नाटक उच्च न्यायालय, कलबुर्गी खंडपीठाचे न्यायमूर्ती जी.बसवराज यांनी व्यक्त केले.

ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत अक्कलकोट न्यायालयाचे न्यायाधीश एन.एल.ए.शेख हे उपस्थित होते.

यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव



शामराव मोरे, विश्वस्त संतोष भोसले, मनोज निकम, न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, एस.के.स्वामी, सिध्दाराम कल्याणी, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, निखील पाटील, प्रवीण घाडगे, गोटू माने, तानाजी पाटील, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, धनंजय निंबाळकर, राजेंद्र पवार, प्रसाद हुल्ले, राहुल इंडे, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, विठ्ठल रेड्डी, यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## वात्रटिका

### बहिण बोले

बहिण बोले भावाला
टक्का तुझा वाढविला...
शब्द पाळ तू आणि
जाग दिल्या शब्दाला...
प्रत्येक महिन्याचा हप्ता
लवकर जमा झाला पाहिजे...
लाड पुरवण्या बहिणीचे
भाऊ व्यस्त दिसला पाहिजे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

# जगातील एकमेव देश जिथे कधीच होत नाही रात्र, फक्त 40 मिनिटांत उगवतो सूर्य

**पूणे (वृत्त सेवा):-** निसर्ग अद्भूत आहे. निसर्गात अनेक गोष्टी घडत असतात. त्यामुळे निसगार्चा थांगपत्ता लागणं कठीणच आहे. निसर्गाच्या चमत्कारामुळे वेगवेगळ्या देशात वेगवेगळी परिस्थिती पाहायला मिळते. जसे की, भारतात जर दिवस असेल तर अमेरिकेत रात्र असते. निसर्ग आणि खगोलीय घटनांचा हा परिणाम आहे. पण वेळ मागे पुढे असली तरी जगात रात्र आणि दिवस होतो हे फिक्स आहे. पण आम्ही तुम्हाला आज जगातील एका देशाबाबत सांगणार आहोत, त्या देशात भारतासारखी दिवस आणि रात्र नसते. तर या देशात 24 तास सूर्य तळपत असतो. तुम्हालाही धक्का बसला ना, पण हे खरं आहे. ज्या ठिकाणी रात्र लहान असते अशी असंख्य ठिकाणे पृथ्वीवर आहेत. पण जिथे रात्रच होत नाही, असाही देश पृथ्वीवर आहे. या देशात रात्र असते पण ती काही मिनिटांचीच. जणू काही बत्तीगुल व्हावी आणि अर्ध्या तासाने वीजप्रवाह सुरु व्हावा अशा पद्धतीने या देशात रात्र होते. या देशात अत्यंत कमी वेळासाठी सूर्यास्त होतो, ही आश्चर्याची गोष्ट आहे. त्यामुळेच या देशात रात्र खूप छोटी असते. यूरोपीय खंडातील नॉर्वे या देशात रात्र अत्यंत कमी असते. रात्र थोडी आणि सोंगे फार ही म्हण जणू काही नॉर्वेसाठीच आहे की काय असं वाटावं अशी परिस्थिती आहे.

### 40 मिनिटांची रात्र

हे महाद्वीप यूरोपात उत्तरेला आहे. उत्तर ध्रुवाच्या सर्वात जवळ असल्याने हा अत्यंत थंड प्रदेश आहे. हा देश बर्फाळ डोंगर आणि ग्लेशियरने भरलेला आहे. नॉर्वेत कधीच सूर्य अस्ताला जात नाही, असं म्हटलं जातं. नॉर्वेच्या हॅमरफेस्टमध्ये केवळ 40 मिनिटाची रात्र होते. इतर वेळी कडकडीत ऊन पडलेलं असतं.

### सूर्यास्तच होत नाही

या ठिकाणी सूर्य दुपारी 12.43 वाजता अस्ताला जातो. केवळ 40 मिनिटानंतर लगेच सूर्योदय होतो. म्हणजे घड्याळात दीड वाजताच सूर्य उगवतो. विशेष म्हणजे हा क्रम रोज चालत नाही. किंवा एक दोन दिवस चालत नाही. तर तो अडीच महिने असतो. त्यामुळेच नॉवेर्ला अर्धी रात्र आणि अर्धा सूर्योदय असलेला देशही म्हणतात. हा देश आर्कटिक सर्कलच्या आत येतो. या ठिकाणी मेपासून जुलैपर्यंत 76 दिवस सूर्यास्त होत नाही.

## प्रबोधन

# जितेपणी कीर्ती । लाभेना भारती

'कीर्ती हवी असेल तर तिचा पाठलाग करू नका तिच्याकडे पाठ फिरवा,' असं साने गुरुजी म्हणाले. पण एका संस्कृत सुभाषितकाराने हा विचार मोडीत काढण्यासाठी 'काहीही करा, मूखार्सारखं वागा, पण प्रसिद्धी मिळवा' असं ठासून सांगताना म्हटलं, घटं भिंद्यात पटं छिंद्यात, कुर्यात रासभारोहणम्! येनकेन प्रकारेन प्रसिद्धपुरुषो भवेत ॥ अर्थात, ह्यगाडगीमडकी फोडा, कपडे फाडा किंवा गाढवावर बसून फिरा, पण काहीही करून एकदाचे प्रसिद्धीचे धनी व्हा.' प्रसिद्धीच्या मागे हात धुऊन लागल्यावर थोडीफार प्रसिद्धी मिळते. पण त्यासाठी केलेला व्यवहार लपून राहात नाही.


खरं तर प्रसिद्धीला हपापलेल्या व्यक्ती मात्र सामान्यच असतात. असामान्य माणसं प्रसिद्धीविन्मुख असतात. थोर मानवतावादी संत गाडगेबाबा कीर्तनासाठी कधी येत आणि कधी कीर्तनातून गायब होत, हे लोकांना कळतच नसे. कुणी त्यांच्या पाया पडू लागला, तर त्याच्या पाठीत खराट्याचा असा तडाखा ते मारत, की पुन्हा त्याने कधी तसा प्रयत्न करू नये. त्यांना प्रसिद्धीचा मनापासून तिटकारा होता. डॉ. उद्धव रसाळे यांनी लिहिलेली एक आठवण फार बोलकी आहे. नाशिकच्या धर्मशाळेत गाडगेबाबांच्या भक्तांनी, सेवकांनी बाबांचा पुतळा बसवला. बाबांना हे समजलं. बाबा नाशिकला आले. त्यांनी सेवकांना खडसावलं आणि आपल्या हाताने पुतळ्याचे तुकडेतुकडे करून तो फोडून टाकला. कीर्तीविमुखतेचं इतकं चांगलं उदाहरण अन्यत्र शोधूनही सापडणार नाही.

गाडगेबाबांना त्यांच्या जिवंतपणीच कीर्ती, प्रसिद्धी अमाप लाभली. पण इतर बऱ्याच थोर पुरुषांना जिवंतपणी उपहास, लोकनिंदा आणि सामाजिक टीका सहन करावी लागली. अशा व्यक्ती मेल्यानंतर ते किती थोर होते, हे समाजाला कळतं, म्हणूनच 'कीतीर्चे मंदिर हे मृतांच्या समाधीवर उभारतात,' असं पाश्चात्त्य विचारवंत डब्ल्यू हेझलिट् म्हणतात. आज संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम ज्ञानोबा माऊली, ज्ञानराज माऊली तुकाराम अशा रूपाने वारकऱ्यांच्या गळ्यातील कंठहार झाले आहेत. त्यांचं स्मरण हजार वर्षांनंतरही उत्कटपणे केलं जातं. पण त्यांच्या जिवंतपणी त्यांना समाजाने ज्या यातना दिल्या आणि मृत्यूच्या दरीत त्यांना ढकलण्याचं निंद्य कृत्यही केलं, हे कधीही विसरता येणार नाही.

कोपर्निकस ह्या थोर शास्त्रज्ञाने सूर्यकेंद्रित विश्व सिद्धान्त मांडून पाश्चात्त्य धार्मिक सनातन्यांच्या समजुतीला जबर धक्का दिला, म्हणूनच तो जिवंत असेपर्यंत त्याला निंदेचा विषय व्हावं लागलं. कोपर्निकसच्या सिद्धान्तांवर आधारित संशोधन करणाऱ्या गॅलिलिओ गॅलिलीला तर न्यायालयाने आठ वर्ष तुरुंगवासाची शिक्षा केली आणि मी केलेलं संशोधन खोटं होतं, असा कबुलीजबाब सक्तीने घेतला. आकाशनिरीक्षणाची पहिली दुर्बिण तयार करणारा हा खगोलशास्त्रज्ञ सक्तीच्या एकांतवासात मरण पावला. पण आज जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ म्हणून कोपर्निकस आणि गॅलिलिओ यांचं नाव घेतलं जातं. सजीवांच्या क्रमिक विकास सिद्धान्ताचे जनक चार्लस डार्विन तर अद्यापिही बायबल आणि चर्चनिष्ठ समाजाच्या दृष्टीने पाखंडीच असून अमेरिका आणि युरोपमधील विज्ञानाच्या पुस्तकांत त्यांचा सिद्धान्त अनेक संस्थांनी समाविष्ट करण्यास विरोध केला आहे.

तरीही उशिरा का असेना, पण पाश्चात्त्य जगाने शास्त्रज्ञांना जेवढी प्रसिद्धी आज दिली आहे, तेवढी त्यांच्या देशातील अन्य कोणत्याही क्षेत्रातील व्यक्तींना दिलेली नाही; हे वास्तव आहे. पण भारताचं वैचारिक विश्व धार्मिक प्रदूषणाने नासलेलं असल्यामुळे आपल्या देशात धार्मिक नेत्यांचा, धर्मगुरू, धर्मचार्यांचाच बडेजाव अधिक दिसून येतो. प्रा. मा. का. देशपांडे म्हणतात, 'ज्या क्षणी नील आर्मस्ट्राँगने चंद्र भूमीवर आपला पाय ठेवला, त्याच क्षणी भारतातील तेहत्तीस कोटी देवांपैकी एका देवतेच्या डोईवर उभे राहून त्या देवतेचा अपमान केला, असे उद्गार भारतीय वारकऱ्यांनी काढले.' भारतात प्रसिद्धीचे दिवे कोणाला ओवाळायचे, हे एका राष्ट्रव्यापी अलिखित धोरणानेच भटी प्रचार-प्रसार माध्यमांनी ठरवून समस्त समाजाच्या आत्मोन्नतीवर ममार्घाती प्रहार केला आहे. ह्या कुटिल धोरणाचा पदार्फाश करताना डॉ. आ. ह. साळुंखे लिहितात, 'येथे वर्तमानपत्रातील वाचकांच्या पत्रव्यवहारात चार ओळी छापून यायच्या झाल्या, तरी प्रस्थापितांच्या सुरात सूर मिसळावा लागतो? याउलट भिन्न मतं मांडणाऱ्या स्वाभिमानी बहुजन समाजाला धर्मद्रोही, देशद्रोही, परधार्जिणे ठरवून बदनाम केलं जातं आणि कर्तृत्ववानाच्या कर्तृत्वाला कधीही जुमानलं जात नाही.' समाजातील अत्युच्च शिखरांनाही आपल्यातील टेकड्यांहून ठेंगणं मानण्याचा उद्योग माध्यमातले सनातनी हुकूमशहा रात्रंदिवस करीत असतात. आज गौतम बुद्ध आणि कबीर असते, तर त्यांनाही या व्यवस्थेने अनुल्लेखानेच मारलं असतं. 'या देशातील ब्राह्मणी व्यवस्थेमुळे ज्ञानप्रसार झाला नाही' असं डॉ. अमर्त्य सेन म्हणाल्यामुळे त्यांना परधार्जिणे ठरवण्याचा निंद्य प्रकार या देशात घडावा, हे चिंताजनक आहे. जातीयतेच्या चिखलातून बाहेर पडण्याचा संकल्प आता सर्वांनी केला पाहिजे, हाच खरा देशोद्धार असेल. कारण-

मरोनी उरावे । कीर्तीच्या रूपाने
संताच्या मुखाने । सत्य आले ॥१
जितेपणी कीर्ती । लाभेना भारती
हाल हाल होती । जिवंतांचे ॥२
लाथ जितेपणी । मृता मिळे खांदा
सांगतात वांधा। गोविंदाग्रज ॥ ३
विषमतावाद्यांना । लाभतसे कीर्ती
वीर म्हणविती । त्रिखंडाचे ॥४
कीर्ती अशी हवी । दिशाकालातीत
जातीधमार्तीत । पृथ्वीवर ॥५
शास्त्रज्ञांची कीर्ती । गावी निशीदिनी
निश्चिंती जीवनी । ज्यांनी दिली ॥६
चार्वाक गौतम । फुले आणि गांधी
समाजा सुगंधी । केले त्यांनी ॥७
माणसाला सुखी । ज्यांनी जगी केले
जगाने वंदिले । महात्म्यांना ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# महाराष्ट्र चेंबर व सोलापूर विद्यापीठ मध्ये रोजगार निर्मिती व कौशल्य प्रशिक्षण साठी झाला करार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर विद्यापीठ, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड एग्रीकल्चर (MACCIA) यांची कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगार निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ (PAHSUS), महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड एग्रीकल्चर (MACCIA), आणि इनोईव्हर्सिटी यांनी एकत्र येत कौशल्य विकास, उद्योग प्रशिक्षण, आणि प्रकल्प व्यवस्थापनासाठी नवा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उद्योगातील वास्तव परिस्थितीशी जोडून त्यांचे रोजगार कौशल्य वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

### सध्या रोजगार निर्मितीसमोरील आव्हाने

आजच्या शिक्षण प्रणालीतील मुख्य समस्या म्हणजे उद्योगाच्या अपेक्षा आणि विद्यापीठीय शिक्षण यामधील तफावत. महाराष्ट्र सरकारने विद्यापीठांसाठी आणि महाविद्यालयांसाठी इंटर्नशिप सेल सुरू करणे अनिवार्य केले असले तरी, सोलापूर विद्यापीठ, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड एग्रीकल्चर, आणि इनोईव्हर्सिटी यांनी हे पाऊल केवळ अनुपालनासाठी न घेता, विद्यार्थ्यांसाठी रोजगारक्षमतेचा पाया मजबूत करण्यासाठी उचलले आहे.

### उद्योगांसाठी, संस्थांसाठी, आणि विद्यार्थ्यांसाठी लाभ

**उद्योगांसाठी:**

1. तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली तयार विद्यार्थी थेट उद्योगासाठी उपलब्ध.
2. इंटर्नशिप प्रक्रियेचे व्यवस्थापन सुलभ करण्यासाठी एक डिजिटल प्लॅटफॉर्म.
3. प्रशिक्षित विद्यार्थ्यांमुळे प्रशिक्षणाचा खर्च आणि वेळ कमी.
4. नवीन समस्यांसाठी सर्जनशील उपाययोजना मिळण्याची संधी.

**संस्थांसाठी:**

1. इंटर्नशिप सेलचे डिजिटल स्वरूप सुलभतेने व्यवस्थापित करता येणे.
2. "एम्पॅनेल्ड मेंटर" बनण्यासाठी संकाय सदस्यांसाठी प्रशिक्षण.
3. महाविद्यालयांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा.
4. विद्यार्थ्यांना उद्योगासोबत प्रत्यक्ष कामाचा अनुभव उपलब्ध करणे.

**विद्यार्थ्यांसाठी:**

1. उद्योगाशी थेट जोडले जाणे, जेणेकरून शैक्षणिक ज्ञान आणि व्यावसायिक कौशल्य यामध्ये समतोल साधता येईल.
2. कौशल्य प्रशिक्षण, मार्गदर्शन, आणि उद्योगांशी संवाद साधण्याची संधी.
3. परवडणाऱ्या शुल्कात (₹२,८००) ४ क्रेडिट OJT कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी.
4. उद्योगांची वास्तव परिस्थिती समजून घेण्याची क्षमता विकसित होणे.

उपक्रमाच्या मुख्य वैशिष्ट्ये

1. विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य OJT प्रोग्रामः ५५-६० संस्थांमधील ४५०० हून अधिक पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी परवडणाऱ्या शुल्कात उपलब्ध.
2. संकाय विकासः डिसेंबरमध्ये होणाऱ्या एकदिवसीय कार्यशाळांमधून संस्थांच्या शिक्षकांना "एम्पॅनेल्ड मेंटर" बनविण्याचा प्रयत्न.
3. इंटर्नशिप सेलसाठी सुसज्जताः विद्यापीठाकडून फर्निचर, उपकरणे, आणि सुविधा; इनोईव्हर्सिटीकडून कार्यरत खर्च व्यवस्थापन.
4. उद्योग-शिक्षण सहकार्यः प्रकल्प, संशोधन, आणि नवोन्मेषी कल्पना यासाठी दीर्घकालीन सहकार्याची स्थापना.

भविष्यातील दृष्टीकोन हा उपक्रम रोजगारनिर्मितीच्या दिशेने एक ठोस पाऊल आहे. विद्यार्थ्यांना कौशल्य वाढविण्याबरोबरच उद्योगांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी तयार करणे, ही याची मुख्य ध्येय आहे. सोलापूर विद्यापीठ, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड एग्रीकल्चर, आणि इनोईव्हर्सिटी यांनी हा उपक्रम रोजगारक्षमता वाढवण्यासाठी नवा आदर्श निर्माण केला आहे.

तसा करार टडव विद्यापीठा सोबत झाला आहे,,ह्या साठी महाराष्ट्र चेंबर चे गव्हनिंग कोन्सिल सदस्य केतनभाई शहा व चेंबर चे बिझनेस सोल्युशन पॉलिक्लिनिक प्रग्राम चे समनव्यक मनीष पाटील हे प्रयत्न शील होते.

महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललीतभाई गांधी,वरिष्ठ उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, चेअरमन स्किल कमिटीचे संदीप भंडारी,सेक्रेटरी जनरल सुरेश घोरपडे,सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रकाश महानवार,इंटर्नशिप सेल प्रमुख अनिल घनवट ह्याचे मोलाचे सहकार्य लाभले.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# बार्शी विधानसभा निवडणूक आ. राऊत यांचा पराभव करत मविआचे ॲड. सोपल विजयी



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीतील चुरशीच्या लढतीत महाविकास आघाडीतील उध्दव ठाकरे शिवसेनेचे ॲड. दिलीप सोपल यांनी महायुतीचे उमेदवार व विद्यमान आमदार राजेंद्र राऊत यांचा पराभव करत विजयी झेंडा रोवला. टपाल मतांसह ६ हजार ४७२ मतांनी ॲड. सोपल विजयी झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी प्रमोद गायकवाड यांनी घोषित केले.येथील शासकीय गोदामात सकाळी साडे आठ वाजता निवडणूक निर्णय अधिकारी प्रमोद गायकवाड व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी एफ.आर. शेख यांच्या उपस्थितीत मतमोजणीला प्रारंभ झाला. सुरुवातीला टपाल मतमोजणी करण्यात आली. यामध्ये ३३३२ पैकी ॲड. सोपल यांना १९९३ तर राऊत यांना १२४९ इतकी मते पडली. या निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार ॲड. सोपल यांना एकूण १ लाख २२ हजार ६९४ इतकी मते, तर महायुतीचे उमेदवार राऊत यांना १ लाख १६ हजार २२२ इतकी मते पडली. प्रारंभी उत्तर बाशीर्तील गावांची मतमोजणी घेण्यात आली. पहिल्या फेरीत महाविकास आघाडीचे ॲड. सोपल यांना ३७११ तर महायुतीचे राऊत यांना ४८७७ पडल्याने यात राऊत ११६६ मतांनी आघाडी घेतली.

**विजयाचे श्रेय जनता आणि कार्यकर्त्यांना**

महाविकास आघाडी व सहकारी मित्र तसेच शहर तालुक्यातील जनता यांचा हा विजय आहे. मतदारांनी मतदान करून मोकळा श्वास घेतला आहे. शांतता आणि संयम ठेऊन हा विजय साजरा करू, असे माझे सर्व कार्यकर्त्यांना आवाहन आहे.

**ॲड. दिलीप सोपल,** नूतन आमदार

**पराभव मान्य; विकासकामे सुरूच राहतील**

बार्शीच्या जनतेने दिलेला कौल मान्य आहे. गटांतर्गत रुसवे-फुगवेचाही यात फटका बसला. यावर नक्कीच आत्मचिंतन करू. छत्रपतींचा मी मावळा आहे. पराभवानंतरही विकासकामे सुरूच राहतील.

**राजेंद्र राऊत,आमदार**

दुसऱ्या फेरीतही राऊत यांची ७६५ मतांची आघाडी कायम राहिली. यात सोपल यांना ५३०७ मते तर राऊत यांना ४९०६ इतकी मते पडली. तिसऱ्या फेरीअखेर महायुतीचे राऊत यांना १४२२ मतांची आघाडी मिळाली, तर महाविकास आघाडीचे उमेदवार ॲड. सोपल हे पिछाडीवरच होते. चौथ्या फेरीअखेर पुन्हा राऊत यांनी २४३२ इतक्या मतांची आघाडी घेतली. मात्र पाचव्या फेरीत शहरातील मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर ॲड. सोपल मतांची आघाडी घेत हळूहळू पुढे येऊ लागले. यानंतर मात्र ॲड. सोपल यांनी मुसंडी मारत राऊत यांना पिछाडीवर टाकत मतांची आघाडी घेतली. सहाव्या फेरीअखेर पुन्हा राऊत यांच्या मतांमध्ये घट झाली.

पुढे शहरातील मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर वैराग भागातील मतमोजणीला प्रारंभ झाला आणि ॲड. सोपल यांच्या मतांची आघाडी कायम राहिली. विजयानंतर ॲड. सोपल यांना निवडणूक निर्णय अधिकारी प्रमोद गायकवाड यांनी निवडीचे पत्र दिले. यावेळी माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले, वैरागचे मकरंद निंबाळकर, निरंजन भूमकर, ॲड. विकास जाधव आदी उपस्थित होते.

# सांगोल्यात 'शेकाप'ला मतविभागणीचा फायदा



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** एम. एम. पठाण सांगोला विधानसभा मतदारसंघात बहुरंगी परंतु प्रत्यक्षात तिरंगी लढत झाल्याने व तीनही उमेदवार मातब्बर असल्याने शहाजी पाटील व दीपक साळुंखे-पाटील यांच्या मतात विभागणी झाल्याने शेकापचे डॉ. बाबासाहेब देशमुख यांना आपला बालेकिल्ला पुन्हा आपल्या ताब्यात घेणे शक्य झाले आहे.स्व. गणपतराव देशमुख यांच्या पश्चात ही पहिलीच निवडणूक होती. देशमुख घराण्यावर प्रेम करणाऱ्या मतदारांनी भरभरून मते देऊन बाबासाहेब देशमुख यांना विजयी करून स्व. गणपतराव देशमुख यांना श्रध्दांजली वाहिल्याचे दिसून आले आहे. शहाजी पाटील यांनी आमदारकीच्या काळात विकासासाठी साडेपाच हजार कोटी रुपये निधी आणला. विकासकामे केली परंतु या कामांमध्ये टक्केवारी असल्याचा आरोप व कामे निकृष्ट प्रतीची झाल्याने तसेच सर्व शासकीय कार्यालयात गेली पाच वर्षे नागरिकांना कामासाठी पैसे मोजावे लागल्याने तीव्र संताप होता. अधिकारीवर्गावर आमदारांचा वचक नसल्याने नियमबाह्य कामे मोठ्या प्रमाणात झाली. विकास तालुक्याचा होण्याऐवजी आमदार, अधिकारी व ठेकेदार यांचा विकास झाला,असा आरोप होत होता. शासनाची लाडकी बहीण योजना तालुक्यात प्रभावी ठरल्यामुळे शहाजी पाटील यांना आपण प्रचंड मताने विजयी होवू, अशी अपेक्षा होती. परंतु सर्वसामान्य मतदारांनी मतपेटीतून त्यांच्या अपेक्षा फोल ठरविल्या.त्याचबरोबर दीपक साळुंखे-पाटील हे उभारल्याने निवडणुकीत रंगत आली, परंतु शहाजी पाटील यांच्या मताचे विभाजन झाले. त्यांनीही प्रचंड ताकद लावून लढत दिल्याने त्यांना ५२ हजार मते मिळाली. २०१९ च्या निवडणुकीत शहाजी पाटील व दीपक साळुंखे-पाटील हे दोघे एकत्र असल्याने ७६८ मतांनी शेकापचे डॉ. अनिकेत देशमुख यांचा पराभव होवून शहाजी पाटील आमदार होते. परंतु २०२४ ला पाटील व साळुंखे दोघेही लढले.त्यांच्या मताची बेरीज एक लाख ४२ हजार १९७ इतकी होते तर शेकापचे बाबासाहेब देशमुख हे एक लाख १६ हजार २८० मते मिळवून २५ हजार ३८४ मताधिक्याने विजयी झाले. दोन्ही पाटील एकत्र राहिले असते तर विजयाचे गणित बदलले असते. १९५२ पासून मराठा व धनगर समाज यांच्यामध्येच प्रामुख्याने येथे विधानसभेला लढत होत आली आहे. १७ पैकी १४ व्या वेळेला धनगर समाजाला आमदारकीची संधी मिळाली. परंतु दरवेळेच्या निवडणुकीत अल्पसंख्याक समाज यात लोणारी, हटकर, दलित, मुस्लीम, लिंगायत, साळी, माळी, कोळी, ब्राह्मण, कोष्टी हे शेकापच्या पाठीशी राहिले होते. परंतु या निवडणुकीत हे समाज दीपक साळुंखे-पाटील व शहाजी पाटील यांच्याकडे झुकल्याचे दिसत आहे.

# वाशिंबे येथील अखंड हरिनाम सप्ताहची सांगता



**वाशिंबे (सचिन भोईटे):-** ग्रामदैवत भैरवनाथ देवस्थान वाशिंबे ता.करमाळा येथे अष्टमीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड नामजप यज्ञ सोहळा रात्री मंदिरात भव्य दिपोत्सव केला गेला. त्यानंतर भैरवनाथ जन्मोत्सव हरी किर्तन सेवा ह.भ.प.हासेगांवकर महाराज यांची सेवा झाली.विविध विषयांवर महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार यांची सात दिवस यामध्ये कीर्तनसेवा पार पडली.गायनाचार्य ह.भ.प.माऊली महाराज झोळ यांच्या कीर्तन सेवेने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी महाराजांनी आपल्या कीर्तन सेवेतून अनेक विषयांना स्पर्श करत उपस्थित त्यांना ज्ञान अमृत पाजले. जिवन जगत असताना कसे जगावे. प्रपंच आणि परमात्मा कसा करावा. जीवनाचे अंतिम ध्येय काय ते मिळवण्यासाठी काय केले पाहिजे. हरिनामाचे महत्व अशी अनेक संत महापुरुषांची उदाहरणे देत ते सत्य मागार्ने चालण्याचा संदेश दिला. विविध बाबी त्यांनी आपल्या कीर्तनातून स्पष्ट केल्या व कार्यक्रमाची सांगता केली.त्यानंतर श्री.विठ्ठल सुखदेव झोळ,मोहन रामभाऊ झोळ,मच्छिंद्र श्रीरंग झोळ, छगन राजाराम झोळ,या परिवाराच्या वतीने पाच हजार लोकांची भोजन महाप्रसाद पंगत पार पडली. कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्थापन भैरवनाथ मंदिर ट्रस्ट,समस्त ग्रामस्थ,भजनी मंडळ,भक्त बलुतेदार मंडळ यांनी केले.

# पंढरपूर-मंगळवेढ्याचा कौल पुन्हा आवताडे यांनाच



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर विधानसभा मतदारसंघात पुन्हा भाजपच्या समाधान आवताडे यांचा विजय झाला असून काँग्रेसच्या चिन्हावर उभ्या असणाऱ्या भगीरथ भालके यांचा ८ हजार ४३० मतांनी पराभव झाला आहे. माजी आ. प्रशांत परिचारक यांच्या पाठिंब्याचा आवताडे यांना मोठा फायदा झाला असला तरी महाविकास आघाडीमध्ये बिघाडी झाल्याने तुतारी चिन्हावर निवडणुकीस सामोरे गेलेल्या अनिल सावंत यांना १० हजारहून अधिक मते मिळाल्याने भालके यांचा पराभव झाला असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट दिसत आहे. सोलापूर जिल्ह्यातील काही मतदारसंघात मोठी चुरस होती. यामध्ये पंढरपूर विधानसभा मतदारसंघाचा समावेश होता.

येथे महाविकास आघाडीमधील काँग्रेस व शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादीमध्ये बिघाडी झाल्याने दोन्ही पक्षांनी आपले स्वतंत्र उमेदवार उभे केले होते तर दुसरीकडे भाजपने माजी आमदार प्रशांत परिचारक यांचे बंड थंड केल्याने दोघांनी हातमिळवणी करीत एकत्रित प्रचार केला. महायुतीची ऐकी व आघाडीत बिघाडी झाल्याचा फटका काँग्रेसचे उमेदवार भगीरथ भालके यांचा तुतारीने केला घात भगीरथ भालके यांना बसला असल्याचे मतमोजणीनंतर समोर आले आहे. समाधान आवताडे यांना १ लाख २३ हजार ९३१ तर टपाली १ हजार २३२ असे एकूण १ लाख २५ हजार १६३ मते मिळाली तर पराभूत भगीरथ भालके यांना १ लाख १५ हजार ६१५ व टपाली १ हजार ११८ असे एकूण १ लाख १६ हजार ७३३ मते मिळाली. आवताडे यांनी भालके यांचा ८ हजार ४३० मतांनी पराभव केला आहे.तुतारी चिन्हावर उभा असणाऱ्या अनिल सावंत यांना एकूण १० हजार २१७ तर मनसेचे दिलीप धोत्रे यांना एकूण २ हजार ५६८ मते मिळाली आहेत. वंचितचे अशोक माने यांना एकूण १ हजार ४६४ मत मिळाली आहेत. दरम्यान, सकाळी मतमोजणी सुरू झाल्यानंतर पहिल्या फेरीपासून भालके यांनी मतांची आघाडी घेतली होती. मात्र पंढरपूर शहरातील मतमोजणी सुरू झाल्यानंतर भालकेंचे मताधिक्य कमी होऊन आवताडे हे आघाडीवर गेले तर पंढरपूर तालुक्यात भालके यांनी आघाडी घेतली. पुन्हा मंगळवेढा शहर व तालुक्यातील गावांची मतमोजणी सुरू होताच आवताडे यांना आघाडी घेण्यास सुरूवात केली. प्रत्येक फेरीअखेर आवताडे व भालके यांचे मताधिक्य कमी जास्त होत होते. यामुळे शेवटपर्यंत कार्यकर्त्यांची धाकधूक वाढली होती. अखेर २६ फेऱ्या नंतर आवताडे यांचा विजय घोषित करण्यात आला. यानंतर कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष सुरू केला. जेसीबीतून गुलाल उधळून, फटाक्यांची आतषबाजी करीत कार्यकर्ते आनंद साजरा करीत होते. भगीरथ भालके यांना १ लाखाहून अधिक मते मिळाली परंतु तुतारीच्या चिन्हावर असलेल्या सावंत यांनी १० हजार म मिळवली. विधानसभा निवडणुकीपूर्वीपासूनच पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यात तुतारीची मोठी चर्चा होती. मात्र भालके यांनी ऐनवेळी काँग्रेसची उमेदवारी घेतली. परंतु तुतारीचा उमेदवार कायम राहिल्याने याचा थेट फटका भालके यांना बसला असल्याचे दिसत आहे. विशेष म्हणजे भालके हे विजयी होणार याचा त्यांच्या कार्यकत्यांना मोठा आत्मविश्वास होता. यामुळे मतमोजणीच्या आदल्या दिवशीच त्यांची शहरातील चौकात विजयाचे फलक लागले होते.

# मतदानानंतरही ईव्हीएम पॉवरपॅक स्थिती ९९% दिसणे तांत्रिकदृष्ट्या वस्तुस्थितीजन्य -निवडणूक निर्णय अधिकारी, अणुशक्ती नगर

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मतदानानंतरही ईव्हीएम पॉवरपॅक स्थिती 99% दिसणे ही बाब तांत्रिकदृष्ट्या वस्तुस्थितीजन्य असल्याचे 172-अणुशक्ती नगर विधानसभा मतदारसंघासाठीचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कळविले आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणी दिवशी 172- अणुशक्तीनगर मतदारसंघातील मतदान केंद्रात मतदानादिवशी ईव्हीएम मशीन पूर्ण दिवस वापरल्यानंतरही काही उवर मध्ये एश्ट पॉवर पॅक स्थिती 99% दर्शविली गेली याबाबत एक उमेदवार यांनी आक्षेप नोंदविला होता.

भारत निवडणूक आयोगाच्या ईव्हीएम मशीन संदर्भातील मार्गदर्शक सूचनांनुसार याबाबत वस्तुस्थितीदर्शक खुलासा करताना 172- अणुशक्तीनगर विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कळविले आहे की, एश्ट पॉवर पॅक 2000 मतांसह 1 उव सह 4 इव ला जोडणी देण्यासाठीची रचना आहे.

जेंव्हा क्षमता जास्त असते तेव्हा व्होल्टेज खूप हळूहळू कमी होते परंतु जेंव्हा बॅटरीची क्षमता 'थ्रेशोल्ड'च्या खाली कमी होते तेव्हा ते वेगाने घसरते.

एकच इव आणि 1000 पेक्षा कमी मते नोंदविली असताना हलके विद्युत प्रवाह असल्यास, बॅटरीचा प्रवाह कमी असतो आणि आऊटपुट व्होल्टेज 7.4V च्या खाली जाऊ शकत नाही आणि त्यामुळे 99% क्षमता दर्शविली जाऊ शकते. त्यामुळे अशा परिस्थितीत ही एक सर्वसामान्य स्थिती असून याबाबतचा आक्षेप अयोग्य असून अशाप्रकारे गैरसमज पसरविणे अयोग्य असल्याचेही निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कळविले आहे.

# सांगोल्याचा गड पुन्हा शेकापच्या ताब्यात शिंदे शिवसेनेचे शहाजी पाटील पराभूत



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** सांगोला विधानसभा मतदारसंघाच्या तिरंगी लढतीत शेतकरी कामगार पक्षाचे डॉ. बाबासाहेब देशमुख हे २५ हजार ३८६ मताधिक्याने विजयी झाले असल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी भैरप्पा माळी यांनी केली. अत्यंत चुरशीच्या झालेल्या मतमोजणी सांगोला शहरातील राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सभागृहात पार पडली असून मतमोजणीसाठी १४ टेबल ठेवण्यात आले होते. एका टेबलावर तीन कर्मचारी नियुक्त करण्यात आले होते. पोस्टल मतदानासाठी दहा टेबल होती व यासाठी प्रत्येकी चार कर्मचारी नेमण्यात आले होते.पोस्टल २ हजार ६६६ मतदान झाले होते त्यापैकी देशमुख यांना १३४२, शहाजी पाटील यांना ५४७ व दीपक साळुंखे पाटील यांना ७३८ मते मिळाली. त्यानंतर पंढरपूर तालुक्यातील भाळवणी गटातील १४ गावांची मतमोजणी घेण्यात आली. त्यामध्ये पहिल्या चार फेऱ्यात व सांगोला तालुक्यातील महूद व चिकमहूद गावाची मोजणीमध्ये शहाजी पाटील आघाडीवर होते. त्यानंतर पाचव्या फेरीअखेर शहाजी पाटील यांची आघाडी कमी करून बाबासाहेब देशमुख यांनी ६२ मतांची आघाडी घेतली. त्यानंतर अकराव्या फेरी

अखेर देशमुख आघाडीवर होते.बारावी फेरी सांगोला शहराची सुरू झाली त्यात देशमुख यांचे ७ हजार २६ मताधिक्य कमी झाले. त्यानंतर राहिलेल्या सांगोल्याचे १४ बूथची मोजणी झाली त्यात पुन्हा देशमुख यांनी ७ हजार ८९९ मताची आघाडी घेतली. सोळाव्या फेरीपासून त्यांचे मताधिक्य वाढत जाऊन ते २५ हजार ३८६ इतके झाले. एकूण मतदान २ लाख ६३ हजार ६७९ झालेले मतदानात शेकापचे बाबासाहेब देशमुख यांनी एक लाख १६ हजार २५६ मते मिळवून विजय मिळवला. शिंदे सेनेचे शहाजी पाटील यांना ९० हजार ८७० तर दीपक साळुंखे पाटील यांना ५० हजार ९६२ मते मिळाली आहेत. मतमोजणी कामी निरीक्षक म्हणून अभिषेक गहलोत, सहायक निवडणूक अधिकारी संतोष कणसे, निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. संदीप भंडारे व डॉ. सुधीर गवळी यांच्यासोबत शंभर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मतमोजणी कक्षामध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड, पोलीस निरीक्षक भीमराव खंणदाळे,जे. डी. मेरसिंग यांनी चोख बंदोवस्त ठेवला होता.

# विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये मतदात्यांचा वाढता टक्का; करवीर मतदारसंघात सर्वाधिक मतदान

**मुंबई (कटूसत्य वृत्त):** महाराष्ट्रात १५ ऑक्टोबर २०२४ रोजी आदर्श आचारसंहिता लागू होऊन २० नोव्हेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 करिता मतदान झाले. या निवडणुकीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्रात मागील सुमारे 30 वर्षामध्ये या वर्षी सर्वाधिक 66.05 टक्के मतदान झाले. मागील पाच वर्षाच्या तुलनेत राज्याच्या मतदान टक्केवारीत सुमारे 5 टक्के वाढ झाली आहे. या वाढत्या मतदान टक्केवारीस राज्यातील मतदार हा नक्कीच अभिनंदनास पात्र ठरला आहे. यावर्षीच्या निवडणुकीत मतदारसंघनिहाय आकडेवारी पाहता मतदार यादीतील नोंदीत महिलांमध्ये करवीर, चिमूर, ब्रम्हपूरी, नेवासा, कागल, आरमोरी, नवापूर, शाहूवाडी, कुडाळ तसेच पळुस-कडेगाव या मतदारसंघांत महिलांचा सहभाग सर्वाधिक दिसून येतो. महाराष्ट्र राज्याच्या 288 मतदारसंघाकरिता राज्यात एकूण 9 कोटी 70 लाख 25 हजार 119 मतदार आहेत. यात 5 कोटी 22 हजार 739 पुरूष मतदार, 4 कोटी 69 लाख 96 हजार 279 महिला मतदार तर 6 हजार 101 इतर मतदार म्हणून नोंदीत आहेत. महाराष्ट्र विधानसभेच्या 2024 च्या निवडणुकीत प्रत्यक्ष मतदान केलेले 6 कोटी 40 लाख 88 हजार 195 मतदार आहेत.

## Classified - छोटी जाहिरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**यात्रा**
उज्जैन, सिहोर, प्रदीप महाराज सह शेगाव, ५ ज्योतिर्लिंग, १८ सप्टेंबर अष्टविनायक, भीमाशंकर, जेजुरी १९ सप्टेंबर, श्रीशैल्य, तिरुपती, रामेश्वर, कन्याकुमारी १० नोव्हेंबर, काशी, अयोध्या २७ नोव्हेंबर
**मल्लिकार्जुन ट्रॅव्हल्स**
**९४२२४६०३१९**

**विकणे आहे**
सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
**संपर्क:**
9881361260

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**
**फॅब्रिकेशन कामासाठी अनुभवी हुशार कामगार पाहिजे.**
**संपर्क:**
**गणेश स्टील फॅब्रिकेशन**
**९९२२५२५२३७**


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.







## कटूसत्य शब्दकोडे क्र. १०८



**उभे शब्द :** १) नाना पाटेकर, अनिल कपूर, अक्षय कुमार यांचा एक विनोदी चित्रपट, स्वागत (इंग्रजीत) २) पोवाडे गाणारा ३) उलटी, वमन ४) बारा गुणिले पाच ५) याचे कणिस भाजून खातात ६) क्रिकेटमधील सिक्सर (मराठीत) ९) दहा गुणिले सात ११) चौघड्याच्या जोडीचे वाद्य १२) तोपर्यंत (ग्रामीण भाषेत) १४) सर्वत्र पसरलेला सुगंध १५) पुरूषांचा नेसावयाचा पंचा २१) श्वास घेण्याची क्रिया २३) छोटा दिवा २४) कपाची जोडीदारीण २६) पटकन, त्वरेने एक फुलझाड २९) झी मराठी वरील विनोदी मालिका-चला ** येऊ द्या ३०) विदूषक ३३) विषमच्या विरूध्दार्थी ३५) पाच आणि दोन मिळून होणारी संख्या ३७) छोटा, बारीक ३९) पतीची आई ४०) एक अभिनेता-**** खान ४१) इराकची राजधानी ४३) कापड फाटताना होणारा आवाज ४४) फर्निचरसाठी या वृक्षाचे लाकूड वापरतात ४५) मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेता-*** भावे ४७) बोल्टचा जोडीदार, टन उलट लिहा ४९) पैसा, संपत्ती ५१) कविता बनविणारा

**आडवे शब्द :** १) हवामानाचा अंदाज वर्तविणारे कार्यालय ३) भारताचे दक्षिणेकडील एक राज्य ५) एक भारतीय फलंदाज-*** पांडे ७) मांजरामधील नर जात ८) अन्नाचा कण श्वासनलिकेत गेल्यास लागतो *** १०) व्यायाम, मेहनत १३) रांग, माळ १५) खतरा १६) माईंड (मराठीत), चित्त १७) जंगल, अरण्य १८) आई (इंग्रजीत) १९) जरचा साथीदार २०) देव २२) एक मराठी महिना २३) परंतु, पक्ष्याचे पंख (हिंदीत) २५) कोकणातील एक पर्यटनाचे स्थळ २७) उन्हाळ्यातील एक महिना २८) मराठी चित्रपट सृष्टीतील एक ज्येष्ठ अभिनेते ३१) वट उलट लिहा ३२) पंधरा दुणे ३४) रानटी बैल ३६) उद्या (हिंदीत) ३८) शरीरावरील मोठा तीळ ४०) लिंबू पाण्याचे पेय ४२) विहिरीतून पाणी खेचण्याचे पूर्वीचे चक्राकार साधन ४४) वर्ष (हिंदीत) ४६) मादीच्या विरूध्दार्थी ४७) नव्वदच्या दशकातील हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेत्री ४८) समर्थ रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ५०) कडक, न दबणारे ५२) नऊ गुणिले दहा ५३) मेंढीपालन करणारा एक वर्ग

**शब्दकोडे क्र. १०७ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग | ड | क | री | | दे | श | मु | ख | | रा | णे |
| र | ग | ड | | का | सा | र | | ळ | | ई | |
| ज | र | | म | ल | ई | | | ख | डू | स | |
| वं | | | हि | | | प | न्हा | ळा | | | दी |
| ता | ना | जी | मा | लु | स | रे | | ट | र | ट | र |
| ला | ट | | | | द | श | क | | ती | न | |
| अ | क | रा | | पा | रा | | रि | कि | ब | | भ |
| क्ष | | ज | हा | ल | | म | ना | | | प | री |
| ल | वं | ग | | घ | डी | | क | र | क | री | त |
| न | | ड | ब | र | | का | पू | स | | म | |
| स | रा | | त्ती | | स | म | र | | व | ळ | सा |
| ते | ह | ती | स | | हा | | | सू | न | | ठ |

# इच्छा भगवंताची परिवारानं किंगमेकरची भूमिका बजावली- आ. देवेंद्र कोठे



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित दमदार आमदार देवेंद्र कोठे यांच्या ऐतिहासिक विजयाबद्दल इच्छा भगवंताची परिवाराच्यावतीनं फटाके फोडत गुलालाची मुक्त उधळण करत मिठाई वाटून मोठा जल्लोष साजरा करण्यात आला.नवनिर्वाचित आमदार देवेंद्र कोठे यांना राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे विशेष निमंत्रित सदस्य किसन जाधव नगरसेवक नागेश गायकवाड यांनी फेटा बांधून मिठाई भरवत पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. दरम्यान रेल्वे लाईन्स येथील किसन जाधव यांच्या संपर्क कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी देवेंद्र कोठे यांच्या ऐतिहासिक विजयाबद्दल हातामध्ये राष्ट्रवादीचे झेंडे घेऊन देवेंद्र कोठे यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी देत गुलालाची उधळण आणि फटाक्याची आतिषबाजी करून महिला कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला याप्रसंगी महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकमेकांना मिठाई भरवत विजयाचा जल्लोष साजरा केला तर नंतर मोरारजी पेठ येथील राधाश्री निवासस्थानी देवेंद्र कोठे यांच्या धर्मपत्नी सौ मोनिका कोठे, माजी महापौर सौ.श्रीकांचना यन्नम, आमदार देवेंद्र कोठे यांच्या भगिनी डॉ. सौ राधिका चिलका,सौ धनश्री विनायक कोंड्याल तसेच कोठे परिवारातील सदस्यांना गुलाल लावत मिठाई भरून यावेळी किसन जाधव आणि नागेश गायकवाड यांनी यांना शुभेच्छा दिल्या तसेच यावेळी राधाश्री बंगल्यासमोर सोलापूर शहर मध्येचे नवनिर्वाचित आमदार देवेंद्र कोठे आगमन होताच त्यांचे जंगी स्वागत करत त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी नवनिर्वाचित दमदार आमदार देवेंद्र कोठे म्हणाले की माज्या ऐतिहासिक विजयामध्ये इच्छा भगवंताची परिवार हा किंगमेकर ची भूमिका बजावला असून इच्छा भगवंताची परिवाराचे सर्वेसर्वा आधारस्तंभ लक्ष्मण मामा जाधव यांचे आशीर्वाद मला लाभले त्यांच्यामुळेच आपल्याला ऐतिहासिक विजय मिळाला असल्याचेही ते म्हणाले. गेल्या अनेक वर्षाच्या राजकारण आणि समाजकारणानंतर प्रथमच स्वर्गीय विष्णुपंत कोठे यांच्या आशीवार्दाने देवेंद्र कोठे यांनी ऐतिहासिक विजय मिळवला राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या सूचनेनुसार महायुतीच्या उमेदवारांच्या विजयासाठी राष्ट्रवादी आणि इच्छा भगवंताची परिवाराने विजयासाठी रणनीती आखून विजयश्री खेचून आणण्यात प्रामाणिकपणे काम केले सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघ, सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार विजयकुमार देशमुख, आणि दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील उमेदवार आमदार सुभाष देशमुख यांच्या विजयासाठी राष्ट्रवादी अजित पवार गट आणि इच्छा भगवंताची परिवाराने एक दिलाने मताधिक्य मिळवण्यासाठी प्रयत्न केले असल्याचेही यावेळी प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य किसन जाधव म्हणाले. याप्रसंगी राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड, राष्ट्रवादी महिला पदाधिकारी रुक्मिणी जाधव, शहर सरचिटणीस संगीता गायकवाड, लक्ष्मी पवार, शोभा गायकवाड, मीना जाधव, सरोजनी जाधव, सुनीता बिराजदार, मारता आसादे,राजश्री जाधव, कल्पना गायकवाड, राष्ट्रवादी शहर सचिव अमोल जगताप, अंबादास पट्टयाप्पा जाधव, शहर उपाध्यक्ष उमेश जाधव, शहर उपाध्यक्ष किरण शिंदे, शहर सरचिटणीस निलेश कांबळे, सरचिटणीस संतोष गायकवाड, अभिजीत कदम, तुषार शिवाजी गायकवाड,श्रीकांत श्रीराम जाधव, शहर संघटक माऊली जरग, माणिक कांबळे, कार्तिक जाधव, उत्कर्ष गायकवाड, अजिंक्य जाधव, संतोष सुनील शिंदे, रोहेश जाधव, राम गायकवाड, शुभम हत्तुरे, प्रथमेश पवार, विक्रांत गरड,समर्थ जाधव, तुषार गायकवाड, ऋषी येवले, महादेव राठोड, श्री बिटला, दिगंबर कुणगिरी यांच्यासह इच्छा भगवंताची परिवाराचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विठ्ठलराव शिंदे कारखान्याच्या गळीतहंगामाचा शुभारंभ

## २६ लाख मे.टन गळीताचे उद्दिष्ट-व्हा. चेअरमन वामनराव उबाळे



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना लि.युनिट नं.१ पिंपळनेर येथील सन २०२४-२५ गळीत हंगामाचा २४ व्या.ऊस गाळप हंगामा शुभारंभ गुरूवारी सकाळी व्हाईस चेअरमन वामनराव उबाळे यांच्या शुभहस्ते गव्हाणीत मोळी टाकून संपन्न झाला.

तसेच युनिट नं.२ करकंब येथील ६ व्या ऊस गाळप हंगामाचा शुभारंभ संचालक पोपट चव्हाण यांच्या शुभहस्ते कारखाना कार्यस्थळावर संपन्न झाला.

या कार्यक्रमा दरम्यान संचालक लाला मोरे व त्यांच्या सुविद्य पत्नी सुगंधाताई मोरे यांच्या शुभहस्ते श्री सत्यनारायण महापुजा कारखाना कार्यस्थळावर पार पडली.या कार्यक्रमास सोलापूर जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे उपस्थित होते.

यावेळी बोलताना व्हा.चेअरमन वामनराव उबाळे म्हणाले की, कारखान्याचे संस्थापक चेअरमन आ.बबनराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही कारखान्याची यशस्वी घौडदौड वेगाने सुरू आहे. विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याने सन २०२३-२४ या गळीत हंगामात युनिट नं.१ कडे १८ लाख ९२ हजार ९४९ मे.टन ऊसाचे गाळप होवून ११ टक्के साखर उता-याने १९ लाख २८ हजार ८५० क्विंटल साखर पोती उत्पादन झाले आहे.तसेच युनिट नं.२ कडे ६ लाख २५ हजार ८८८ मे.टन ऊसाचे गाळप होवून ११.१४ टक्के साखर उता-याने ६ लाख ६३ हजार ९०० क्विं.साखर पोत्याचे उत्पादन झाले आहे.दोन्ही युनिट चे मिळून २५ लाख १८ हजार ८३७ मे.टन गाळप होवून २५ लाख ९२ हजार ७५० क्वि. साखर पोत्याचे उत्पादन झाले आहे.

चालू २०२४-२५ हंगामासाठी ऑफ सिझनमधील कामे वेळेत पूर्ण होवून गाळपासाठी दोन्ही कारखाने सज्ज झालेले आहेत. युनिट नं.१ पिंपळनेर येथे २५ हजार हेक्टर ऊसाची नोंद झालेली आहे.युनिट नं.२ करकंब येथे ७ हजार ३०० हेक्टर ऊसाची नोंद झालेली आहे. या हंगामामध्ये युनिट नं.१ कडे २० लाख व युनिट नं.२ कडे ६ लाख मे. टन ऊस गाळप करण्याचे उद्दिष्ट संचालक मंडळाने निश्चित केले आहे.हंगाम २०२४-२५ मध्ये ऊस पुरवठा होण्यासाठी ऊस तोडणी वाहतूकीसाठी बैलगाडी, ट्रक, ट्रॅक्टर व टायर बैलगाडीचे करार करण्यात आलेले असून प्रत्यक्ष यंत्रणा कामावर रुजू झालेली आहे. सन २०२४-२५ गाळप हंगाम यशस्वी करण्यासाठी सभासद,ऊस पुरवठादार, ऊस तोडणी वाहतूक कंत्राटदार,अधिकारी व कर्मचारी यांनी सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

यावेळी संचालक रमेश येवले-पाटील, शिवाजी डोके, लक्ष्मण खुपसे, लाला मोरे, सचिन देशमुख, पांडूरंग घाडगे,पोपट चव्हाण,सुरेश बागल, प्रतापराव नलवडे, अशोक मिस्कीन, शिवाजी पाटील, राहूल पुरवत, अजित देशमुख, जोतीराम मदने, समाधान नरसाळे, हरिनाना कानगुडे, मारूती कोरके, नवनाथ पवार, गजानन पाटील, रविंद्र नरसाळे, बंडूनाना लांडे, कार्यकारी संचालक एस.एन.डिग्रजे, युनिट नं.२ चे जनरल मॅनेजर एस. आर.यादव, चिफ इंजिनिअर एस.एस.महामुनी, चिफ केमिस्ट बी.जे.साळुंखे, शेती अधिकारी आर.जे.पाटील सर्व जिप. व पं.स. सदस्य, मार्केट कमिटी सदस्य, आजी माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, सभासद शेतकरी, ऊस पुरवठादार, कारखाना अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोलापूरला गतवैभव मिळवुन देण्यासाठी निस्वार्थपणे अहोरात्र झटणार - सोलापूर विकास मंच



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर विकास मंचच्या वतीने गुरुवार दिनांक २१ नोव्हेंबर रोजी अंत्रोळीकर नगर येथील पुष्पस्नेह लॉन्समध्ये स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि सोलापूरातील संस्था, संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या उत्साहाने या मेळाव्यात सहभागी झाले. मंचच्या गेल्या चार वर्षांच्या कायार्चा आढावा, भविष्यातील उद्दिष्टे, आणि सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठीच्या उपाययोजनांवर या मेळाव्यात चर्चा करण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय कुंदन जाधव यांनी केले. योगीन गुर्जर यांनी मेळाव्याचे उद्दिष्ट मांडत उपस्थितांचे स्वागत केले. केतन शहा यांनी मंच स्थापनेचा हेतू आणि कार्यसंस्थेची थोडक्यात ओळख सादर केली. विजय कुंदन जाधव यांनी चार वर्षातील कामगिरीचा आढावा घेतला, तर मिलिंद भोसले यांनी मंचच्या पुढील कार्यकिदीर्ची माहिती दिली. याशिवाय, उपस्थित मान्यवरांनीही आपली मनोगते व्यक्त करून

सोलापूर विकास मंच सोलापूरसाठी आमदार व खासदार सारखेच काम करीत आहेत अशी लोकभावना आजच्या कार्यक्रम मध्ये सर्व मान्यवरांनी बोलुन दाखवली तथा सोलापूरच्या प्रगतीसाठी सहकायार्ची ग्वाही दिली

**चार वर्षांत केलेली ठळक कामगिरी :**

सोलापूर विकास मंचने गेल्या चार वर्षांत शहराच्या समस्यांवर प्रकाश टाकत विविध उपक्रम राबवले आहेत.

**संपूर्ण सोलापूरचा विकास हेच उद्दिष्ट :**

स्नेह मेळाव्यात सोलापूरच्या विकासासाठी संघटनांच्या एकत्रित प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

उपस्थित मान्यवरांनी सोलापूर विकास मंचच्या माध्यमातून सोलापूरला देशातील एक प्रगतशील शहर म्हणून नावारूपाला आणण्याचा निर्धार व्यक्त केला. सोलापूर विकास मंचच्या या पुढाकारामुळे शहराच्या विकासासाठी नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोलापूर विकास मंचचे सदस्य ॲड.दत्तात्रय अंबुरे, आनंद पाटील आणि सुहास भोसले यांनी मेहनत घेतली.

# बुधवारपासून शिक्षकांसाठी स्काऊट गाईड प्रशिक्षण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहर- जिल्हा स्काऊट गाईड संस्थेच्यावतीने प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांसाठी स्काऊट गाईड निवासी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

बाळे येथील ज.रा.चंडक प्रशालेत दि.२७ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर दरम्यान प्राथमिक व प्रगत हे दोन्ही प्रशिक्षण होणार आहे. सध्या शासनाच्यावतीने सर्व शाळेत स्काऊट गाईड विषय अनिवार्य करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना स्काऊट गाईड गणवेश देण्यात आली आहे.

यासाठी शिक्षकांना प्रशिक्षित होणे आवश्यक आहे. पहाटे ५:३० ते रात्री १०:०० अशी प्रशिक्षणाची दिनचर्या असते. पहाटे राम धून, फिजीकल जर्क ,बी.पी. व्यायाम,योगा, प्राणायाम, सूर्य नमस्कार, संचलन मार्च पास, इस्पेक्षण, कोपरा सजावट, ध्वजारोहण, बौद्धिके अभ्यासक्रम, मैदानी खेळ,परिसर भेटी, प्रात्यक्षिके, शेकोटी आदी अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण दिली जाते.सदर प्रशिक्षणाप्रसंगी प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त शंकर यादव यांच्यासह राज्यातील अधिकारी भेट देऊन मार्गदर्शन करणार आहेत.तरी शहर जिल्ह्यातील सर्व माध्यमाच्या शासकीय, खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी सहभाग घेण्याचे आवाहन उपशिक्षणाधिकारी स्वाती हवेली, स्काऊट संघटक श्रीधर मोरे, गाईड संघटक अनुसया सिरसाट यांनी केले आहे.

# विष्णुपंत कोठे यांचे स्वप्न देवेंद्र कोठे यांच्या विजयाने पूर्ण





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरमध्य मतदारसंघात देवेंद्र कोठे यांनी कमळ फुलवत सोलापूरच्या राजकारणात 'कोठे' ब्रॅन्ड कीती ताकदवान आहे हे दाखवून दीले.शहराच्या राजकारणावर दीर्घकाळ एकहाती पकड ठेवणारे सुत्रधार म्हणून कै. विष्णुपंत कोठे यांची ओळख होती. राजकारणातील 'चाणक्य'अशी ओळख असलेल्या विष्णुपंतांनी आमदार व्हावे अशी कार्यकर्त्यांची ईच्छा होती.हे चाळीस वर्षांचे स्वप्न देवेंद्र कोठे यांच्या आमदारकीने पूर्ण झाले आहे. आजोबा विष्णुपंत कोठे यांचे स्वप्न नातू देवेंद्र कोठे यांनी पूर्ण केले आहे. संपूर्ण राज्याचे आणि सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागलेल्या सोलापूर शहर मध्य मतदारसंघांमध्ये भारतीय जनता पाटीर्चे कमळ पहिल्यांदाच फुलले आहे. या ठिकाणी प्रथमच उमेदवारी मिळालेले देवेंद्र कोठे हे आमदार झाले आहेत. त्यांनी एमआयएमचे फारूक शाब्दि, काँग्रेसचे चेतन नरोटे, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे आडम मास्तर यांचा पराभव केला. प्रणिती शिंदे यांनी सोडलेला मतदार संघ आता भाजपने काबीज केल्याचे चित्र दिसत आहे. दरम्यान काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जाणारा शहर मध्य विधानसभा मतदारसंघ यंदा भाजपने खेचून आणला आहे. मतमोजणीस सुरुवात झाली ,पहिल्या फेरीला देवेंद्र कोठे यांनी लीड घेतला, त्यानंतर फारुख शाब्दि यांनी चौथ्या फेरीपर्यंत लीड घेतला. त्याफेरीनंतर मात्र देवेंद्र कोठे यांनी मोठे मताधिक्य घेतले आणि ते मताधिक्य कायम ठेवले. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिलेच नाही. दरम्यान लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या बालेकिल्याला सुरूंग लावलेल्या देवेंद्र कोठे यांना राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उमेदवारी दिली. फडणवीसांचा विश्वास सार्थ ठरवत काँग्रेसच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लावत दणदणीत विजय मिळवला आहे.सोलापूर शहर मध्य मतदारसंघात देवेंद्र यांनी अतीशय संयमी आणी शांतपणे राजकीय व्युहरचना आखत सर्व समाजघटकांचा विश्वास संपादन केला आणी कोणताही गाजावाजा न करता मतदारांशी वैयक्तीक संपर्क साधण्यावर भर दीला.महिलांना लाडकी बहीण म्हणून समाजमाध्यमांवर भावनीक पत्र लीहून देवेंद्र कोठे यांनी मतदान करण्याची साद घातली आणी लाडक्या बहिणींनी भावाच्या आवाहनाला प्रतिसाद देत मतांची ओवाळणी घालून विजयी केले.शहरमध्य मतदारसंघातील कष्टकरी, कामगार वगार्ला देवेंद्र यांनी आधार देत प्रश्न सोडविण्याचा विश्वास दीला. हाच विश्वास देवेंद्र कोठे यांना विजयापर्यंत घेऊन गेला.

# प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर दुचाकी मालिका सुरू- आकर्षक क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर या कार्यालयात लवकरच दुचाकी मालिका सुरू करण्यात येत आहे. वाहनांची नवीन मालिका चालू होण्याच्या दिवशी प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये मोठया प्रमाणावर इच्छुकांची गर्दी होते व त्यामुळे कार्यालयीन व्यवस्थेवर त्याचा ताण पडतो व बऱ्याच वेळा नागरिकांनाही याचा त्रास होतो. नागरिकांना होणारा त्रास कमी व्हावा व त्यांना हवा असणारा आकर्षक नोंदणी क्रमांक उपलब्ध असल्यास त्यांना सुलभतेने तो मिळावा, यासाठी ज्या दुचाकी वाहन मालकांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहीत शुल्क भरुन हवे असतील त्यांनी दिनांक 26 नोव्हेंबर 2024 रोजी सोबतच्या वेळापत्रकानुसार कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी 11.00 ते दुपारी 4.00 या दरम्यान विहीत नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या नवीन नोंदणी विभागात डीडी (केवळ क्र 16 अन्वये जारी झालेले डीडी), पत्याचा पुरावा, आधार लिंक मोबाईल नंबर, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह स्वतः जमा करावा.

हा डीडी फक्त “Dy R.T.O. Solapur” यांच्या नावे नॅशनलाईल/ शेडयुल्ड बँकेचा असावा. या व्यतिरिक्त इतर नावाचे डीडी बाद ठरवले जातील.

अजासीबत केंद्रीय मोटार वाहन नियम 1989 च्या नियम 4 तसेच महाराष्ट्र मोटार वाहन नियम 1989 च्या नियम 5 अ मध्ये विहीत केलेल्या पत्याच्या पुराव्याची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक असेल (उदा. आधार कार्ड, टेलिफोन बील इ.)

एकाच नंबरकरिता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी दिनांक 26 नोव्हेंबर 2024 रोजी दुपारी 05.00 वाजता कार्यालयीन नोटीसबोर्डवर लावण्यात येईल. या यादीतील अर्जदारांना लिलावाकरिता जर जास्त रक्कमेचा डीडी जमा करावयाचा असेल त्यांनी सोबतच्या वेळापत्रकानुसार दर्शविलेल्या दिवशी (दि. 27 नोव्हेंबर 2024 रोजी दुपारी 02.00 वाजेपर्यंत) सीलबंद लिफाफ्यात कार्यालयात जमा करावा. लिलावासाठी सदर केलेला डीडी रुपए 300/- पेक्षा कमी रक्कमेचा नसावा. सदर डीडी फक्त “Dy R.T.O. Solapur” यांच्या नावे नॅशनलाईज/शेडयुल्ड बँकेचा असावा. या व्यतिरिक्त इतर नावाचे डीडी बाद ठरवले जातील डीडी कमीत कमी एक महिना मुदतीमध्ये असावा. दिनांक 27 नोव्हेंबर 2024 रोजी दुपारी 04.00 वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांच्या उपस्थितीत पात्र व्यक्तीसमोर (संबंधित अर्जदार) लिफाफे उघडुन ज्या अर्जदाराने विनिर्दिष्ट शुल्कापेक्षा जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केला असेल त्यास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाईल.

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून 180 दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर करून वाहन क्रमांक प्राप्त करून घ्यावा अन्यथा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व फी सरकारजमा होईल, कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेली फी, कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही. वाहन धारकाने एका वाहनासाठी एकापेक्षा जास्त आकर्षक नोंदणी क्रमांक आरक्षित करण्यासाठी कार्यालयात डी. डी. जमा केल्यास सदर बाबीस कार्यालय जबाबदार राहणार नाही.

दुचाकी वाहनांच्या मालिकेचे वेळापत्रक (MH 13 ER)

दि. 26 नोव्हेंबर 2024 तिप्पट शुल्कचे अर्ज व परिवहन संवर्ग वाहनांसाठी नियमित अर्ज स्विकारणे. वेळ -11 ते 4 दि. 26 नोव्हेंबर 2024 सायंकाळी 05.00 वाजता यादी जाहीर. दि. 27 नोव्हेंबर 2024 दुपारी 02 वाजेपर्यंत बंद लिफाफ्यात लिलावासाठीचे डीडी स्विकारणे रुपए 300/- पेक्षा जास्त रकमेचे डीडी जमा करणे गरजेचे.

दि. 27 नोव्हेंबर 2024 तिप्पट शुल्काच्या आलेल्या अजार्साठी व परिवहन संवर्ग वाहनांसाठी आलेल्या डबल अर्जांचा लिलाव दुपारी 04.00 वाजता. अशी माहिती सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी सोलापूर यांनी दिली आहे.

# उत्तम प्रकारे जानकर यांनी आमदारकीचे रणांगण जिंकले



आता राजकारण संपले असून, समाजकारण सुरू झाले आहे. निवडणूक संपली की राजकारण संपले. जेथे जेथे विकास पाहिजे, तेथे तेथे भेदभाव न करता, सर्वांचा विकास करणे गरजेचे आहे.त्यामुळे पुढील काळात आपण एकत्र येऊन विकासाचे समाजकारण सुरू ठेवु.

**जयसिंह मोहिते पाटील**

माढा, करमाळा, सांगोला, माळशिरस, मोहोळ व बार्शी येथे महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी झाले आहेत.आम्ही सर्वजण विकासाच्या मुद्द्यावर एकत्र येऊन विधानसभेत प्रश्न मांडून, विविध योजना खेचून आनो,माज्या विजयासाठी अनेक जण आहोरात्र झटत होते. मोहिते पाटील यांच्या साथीने आज आमदार म्हणून संधी मिळाली, हे मी माझे भाग्य समजतो. जेथे जेथे अन्याय होईल, तेथे तेथे संघर्ष करून, तालुक्याच्या विकासाची घोडदौड कायम सुरू ठेवू.

**नूतन आमदार उत्तमराव जानकर**

**अकलूज (विलास गायकवाड):-** पंधरावी फेरी गाठली तरी रामभाऊ आघाडीचा डाव टाकतच राहिले, यामुळे कार्यकर्त्यांच्या हृदयाची धडधड वाढत गेली;आखेर सतराव्या फेरीनंतर उत्तमराव जानकर यांनी उत्तम प्रकारे रणांगण गाजवायला सुरुवात केली आणि बघता बघता रामभाऊ सातपुते यांचा 13147 मतांनी पराभव करीत विजयी खेचून आणला.

माळशिरस विधानसभा राखीव मतदार संघातून डझन भर उमेदवार आमदारकीचे स्वप्न साकार करण्यासाठी, निवडणुकीच्या आखाड्यात उतरले होते.यामध्ये राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून उत्तम जानकर तर भाजप कडून पुन्हा आमदार होण्याचा विडा,राम सातपुते यांनी उचलला होता.डझन भर उमेदवारा मध्ये प्रमुख लढत उत्तम जानकर आणि राम सातपुते यांच्यात दिसू लागली.माळशिरस विधान सभेच्या रणांगणात मोहिते पाटील यांच्यासह त्यांचा पूर्ण गट व उत्तम जानकर यांचा पूर्ण गट मोठ्या ताकतीने उतरला होता.

मागील पंच वार्षिक निवडणुकीचा निकाल पाहता, आताच्या निवडणुकी मध्ये उत्तमराव जानकर सहज बाजी मारतील असे चित्र निर्माण झाले होते,परंतु कडवी झुंज पहाण्यास मिळाली.

२५ फेऱ्यांपैकी १६ व्या फेरीपर्यंत राम सातपुते यांनी आघाडी कायम ठेवली होती.

राम सातपुते यांच्या बाजूने पोषक वातावरण आहे असा समज कार्यकर्त्यांचा झाला.काहीशा प्रमाणात तोफांची सलामी दिली गेली तर गुलालाची उधळण ही झाली. अखेर १७ व्या फेरीनंतर उत्तमराव जानकर यांनी

षटकार मारण्यास सुरुवात केली आणि २५ व्या फेरीनंतर महाविकास आघाडी पुरस्कृत उमेदवार उत्तम जानकर यांना १लाख २० हजार ३२२ व १३९१ पोस्टल मते अशी एकूण १ लाख २१ हजार ७१३ मते मिळाली तर भाजप पुरस्कृत उमेदवार राम सातपुते यांना १लाख ८ हजार ५७ व ५०९ पोस्टल मते अशी एकूण १ लाख ८ हजार ५६६ अशी मते मिळाली. यामध्ये उत्तम जानकर यांनी १३१४७ मतांनी उत्तम विजयी मिळवला. ‘शिवरत्न बंगल्यावर विजयी उत्सव साजरा’ यावेळी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, ज्येष्ठ नेते जयसिंह मोहिते पाटील, मदनसिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, अर्जुनसिंह मोहिते पाटील, संग्रामसिंह मोहिते पाटील, शिवतेजसिंह मोहिते पाटील, शिवसेना नेते स्वप्निल वाघमारे, विकास धाईंजे यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गाईच्या पोटातून काढले तब्बल 26 किलो प्लास्टिक



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** संग्रामनगर अकलूज येथील गो शाळेमध्ये एका आजारी वासराच्या पोटातून ऑपरेशन करून तब्बल 26 किलो प्लास्टिक काढण्यात आले आहे.

संतोष जाधव हे गत 10 वर्षांपासून स्वखर्चाने गो सेवा व गो रक्षण करत आहेत. आज तागायत त्यांनी अनेक आजारी, अपघात झालेल्या, शेतकऱ्यांनी एसिड टाकून जखमी केलेल्या गाई, घोडे व इतर जनावरे स्वखर्चाने उपचार करून त्यांना नवजीवन दिले आहे. नुकतेच एक आजारी असलेले देशी गाईचे वासरू त्यांच्या गो शाळेत आणले गेले. या वासराचे पोट भले मोठे फुगले होते. संतोष जाधव यांनी वैद्यकीय अधिकारी डॉ. वाघमोडे यांना बोलावले असता त्यांनी ऑपरेशन करून या वासराच्या पोटातून तब्बल 26 किलो प्लास्टिक बाहेर काढले.

संतोष जाधव यांच्या या गो सेवेबद्दल संपूर्ण अकलूज व परिसरातून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे. परिसरातील दानशूर नागरिकांनी गो शाळेला सढळ हाताने मदत करावी असे आवाहन यावेळी संतोष जाधव यांनी केले आहे.

# मुर्तीजापुर विधानसभा 32 मध्ये आ. हरीश पिंपळे चौकार यशस्वी



**मुतीर्जापुर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रात योयो आदित्यनाथ फॅक्ट यशस्वी. लाडक्या बहिणीने लाडक्या भावाला प्रचंड मतांनी केले विजय महाराष्ट्रात महायुतीला एक हाती सत्ता मिळाली. अकोला मुतीर्जापुर विधानसभा 32 मध्ये आमदार हरीश भाऊ पिंपळे यांची चौथ्यांदा आमदार पदी विक्रमी मतांनी विजय. झाले. मूर्तिजापूर विधानसभा 32 मधील मूर्तिजापूर व बाशीर्टाकळी मधील लाडक्या बहिणी व आदित्य योगी यांच्या जाहीर सभेमुळे घोषवाक्य मुळे बटेंगे. तो कटेंगे सात रहेंगे तो सेफ रहेंगे यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात जागृत होऊन विधानसभेत महायुतीला एक हाती सत्ता दिली. लाडक्या बहिणी व लाडके भाऊ , लाडक्या बहिणींनी भरभरून मतांनी भाऊबीज भेट दिली. शेतकरी शेतमजूर मतदारांनी महायुतीला विकास कामावर जनतेने घरघोश मतांनी आपापल्या मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवारांना जन आशीर्वाद देऊन पुन्हा महाराष्ट्रात महायुतीचे सरकार बनण्याचे स्वपन साकार केले आहे. हरीश भाऊ पिंपळे यांनी 35 हजार 864 विक्रमी मतांनी विजय संपादन केला. महाविकास आघाडीचे उमेदवार सम्राट डोंगरदिवे यांचा दारुण मतांनी पराभव केला. त्यांनी मीडिया प्रतिनिधींना बोलताना मुतीर्जापुर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार, मुतीर्जापुर एमआयडीसी मोठा उद्योग आणून मतदारसंघातील तरुणांना रोजगार संधी उपलब्ध करणार आहे. शकुंतला रेल्वेचे ब्रॉडगेज मध्ये रूपांतर करून नागरिकांना प्रवास करण्यासाठी मोठा फायदा होणार आहे. मुतीर्जापुर मतदारसंघात शाळांमध्ये दर्जेदार शिक्षणाची व्यवस्था करणार.